म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२८
सन १९२०

# मोगऱ्याचीं फुलें

## गुच्छ

५

गं. रा. मोगरे.

कि. ६ आणे

REFBK-0001816

विविधज्ञानविस्तार ऑफिसांत आणि
…णायण छापखान्यांत विकत मिळतील.

ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ नं. ६४
ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. १८९८

# मोगऱ्यांचीं फुलें.

अर्थात्

गंगाधर रामचंद्र मोगरे

यांची कविता.

## गुच्छ ५.

REFBK-0001816
REFBK-0001816

ग्रंथसंग्रहालय ठाणे
ना. क्र. १८१६

प्रथमावृत्ति १०००.

जुलै, १९२०.

किंमत ६ आणे-

प्रत्येक गुच्छाची किंमत सहा आणे. पांचही गुच्छ एकत्र बांधलेले, किंमत दोन रुपये.

**प्रकाशक** आणि **प्रिंटर**:—अनंत आत्माराम मोरमकर,
श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ४०२, ठाकुरद्वार, मुंबई.

**गंगाधर रामचंद्र मोगरे.**

जन्म—२१ जानेवारी १८५७
मृत्यु—११ मार्च १९१५

प्रकाशनाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकांचें हृद्गत.

हा पांचवा गुच्छ प्रसिद्ध करून, कै. गंगाधरपंत मोगरे यांची एकंदर कविता आम्ही आतां रसिक वाचकांच्या पुढें मांडली आहे. ही वाङ्मयसेवा त्यांस मान्य होईल अशी आशा आहे.

२. आमच्या विनंतीस मान देऊन प्रस्तुत गुच्छास रा. रा. लक्ष्मण गणेश शास्त्री लेले यांनीं 'प्रास्ताविक शब्द' लिहून दिले, याबद्दल आम्ही तर त्यांचे आभारी आहोंच; परंतु या मार्मिक उपोद्-घातांत मोगऱ्यांच्या कवितेचें मर्म सुंदर रीतीनें दाखवून दिल्याबद्दल वाचकवर्गही त्यांचा अत्यंत आभारी होईल ही खात्री आहे.

३. या पांच गुच्छांत प्रसिद्ध झालेल्या कवितेबाहेर कै. गंगाधर-पंताची कांहीं कविता असेल असें वाटत नाहीं. तथापि कोणाजवळ असल्यास ती त्यांनीं कृपा करून आमच्याकडे पाठवावी. पुनरावृत्तीचे वेळीं तिचा उपयोग करून घेतां येईल.

४. 'वृंदा' काव्यामध्यें एका सुचरित कुटुंबाचें चित्र रेखाटण्याचा गंगाधरपंतांचा उद्देश होता. या काव्याच्या १३८ आर्या होऊन पुढें तें अपुरेंच राहिलें. त्यांतून ३६ आर्या गाळून, बाकी कविता "गृहस्थाश्रम-गृहिणी आणि गृहस्थ" या नांवाखालीं दुसऱ्या गुच्छामध्यें छापल्या गेल्या आहेत. म्हणजे गंगाधरपंतांच्या ३६ आर्या या पांची गुच्छांमध्यें अप्रकाशित राहिल्या आहेत. पुढील आवृत्तीचे वेळीं पाहतां येईल.

५. इ. स. १९२१ खालीं, मराठी भाषा ऐच्छिक विषय घेऊन एम्. ए. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं मुंबई युनिव्हर्सिटीनें "मोग-ऱ्यांची कविता" नेमिली आहे. या विद्यार्थ्यांना मोगऱ्यांची एकंदर कविता योग्य वेळीं मिळण्याची आतां सोई झाली आहे. कवितेस सामान्यतः गिऱ्हाईक कमी; तथापि अर्वाचीन कवितेच्या भक्तांच्या इच्छेस अनुसरून, आणि मोगऱ्यांचा विस्ताराशीं असलेला दीर्घ आणि दृढ परिचय स्मरून, आम्ही त्यांची एकंदर कविता स्वतंत्र पुस्तक-रूपानें लोकांस सादर केली. यांत आम्हांवर रुसण्याचें, अगर आम्हांवर

प्रच्छन्न टीका करण्याचें अथवा करविण्याचें, कोणाही अन्य कवीच्या खऱ्या अथवा दांभिक भक्तास वास्तविक कारण नाहीं. अर्वाचीन सर्व प्रतिभावान् कवींची इतस्ततः पसरलेली कविता पुस्तकरूपानें छापून निघणें अत्यंत इष्ट आहे. शक्य झाल्यास दुसऱ्या एकाद्या चांगल्या कवीची कविता प्रकाशित करण्यास आम्ही बिलकुल कसूर करणार नाहीं.

६. कै. गंगाधरपंतांचें चरित्र त्यांचे पुतणे केशवराव मोगरे यांनीं लिहिण्यास घेऊन निमेशिमें पुरेंही केलें होतें. परंतु तें पुरें होण्यापूर्वींच त्यांच्यावर गेल्या वर्षीं दुष्ट यमाचा घाला आला! तें अपुरें चरित्र पुरें करण्याचें काम आतां त्यांच्या एका स्नेह्यानें पत्करिलें आहे. पुरें झाल्यावर तें, त्यांचे विस्तारांतील गद्यलेख, आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या संबंधानें प्रसिद्ध झालेलीं शोकार्तगीतें एका स्वतंत्र पुस्तकांत छापण्याचा आमचा विचार आहे. कधीं सिद्धीस जाईल तेव्हां खरें.

---

## पांचव्या गुच्छाची अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. |
|---|---|
| खरी राजनिष्ठा. ... | १ |
| भिक्षुक. ... ... | ३ |
| काकांची कानउघाडणी: एक स्वप्न. | ४ |
| तापसीबाई. ... ... | ६ |
| अण्णा किर्लोसकर. ... | ८ |
| पुस्तकावर अभिप्राय. ... | ११ |
| वाग्युद्ध. ... ... | १५ |
| आपल्या आईपाशीं हर्यक्षाचें स्वापमानकथन. ... | २३ |
| माझा संसार ... ... | २७ |
| बाजी–राज्यवियोग. ... | २९ |
| सर्व हिंदुधर्माभिमानी लोकांस विज्ञापना... | ३१ |
| वधूवरांस उपदेश ... | ३३ |
| अभिनंदन ... ... | ३५ |
| " देव म्हणजे काय ? " | ३६ |
| शारदोत्सव. ... ... | ३७ |
| संक्रांतीचा तीळगुळ. ... | ३८ |
| महाराष्ट्रजनविज्ञापना ... | ३९ |
| स्वागतम् ! सुस्वागतम् ! ! | ४८ |
| आर्य–मातृसंदेश. ... | ५१ |
| हार्डिंग–जन्मदिनोत्सव. ... | ५५ |
| मंगलाचरण. ... ... | ५८ |
| नवयुग. ... ... | ५९ |
| राष्ट्रगीत. १, २, ३, ४... | ६२–६६ |

# प्रास्ताविक शब्द.

सायन्तनीषु मकरन्दवतीषु भृङ्गाः
किं मल्लिकासु परमन्त्रणमारभन्ते ॥

सुभाषित.

महाराष्ट्रांत विश्रुत असलेले आधुनिक मराठी कवि कै. गंगाधर रामचंद्र मोगरे यांनीं रचिलेल्या कवितांचे चार गुच्छ यापूर्वीच लोकांपुढें आलेले आहेत. त्यांच्या कवितांचा हा पांचवा गुच्छ आतां मराठी काव्यरसिकांस सप्रेम समर्पण करण्यांत येत आहे. मोगरे यांच्या कवितांचा दुसरा गुच्छ, त्यांची ' अभिनवकादंबरी, ' व तिच्याबरोबर प्रसिद्ध झालेली ' मराठी ग्रंथकारांस प्रार्थना, ' या काव्यकलापाचाही परामर्श प्रस्तुतच्या पांचव्या गुच्छाबरोबर आम्हीं घ्यावा अशी प्रकाशकांनीं आम्हांस पत्र पाठवून इच्छा प्रकट केली. मोगरे–कवींविषयीं आम्हांस बहुमान असल्यामुळें व प्रकाशकांची सदिच्छा अनुल्लंघनीय वाटल्यामुळें, प्रकृतीच्या अस्वास्थ्यास न जुमानतां, उपरिनिर्दिष्ट काव्यकलापावर प्रस्तावनेदाखल आम्ही चार शब्द खालीं लिहीत आहों. या कामाकडे वळण्यापूर्वी प्रथमतः

## (१) मोगरे व त्यांची कृति यांचें सामान्य स्वरूप

पाहूं या. सत्तावन सालच्या राजकीय वणव्याच्या ज्वाला शांत होत असतां मोगरे यांचा जन्म झाला, व यूरोपीय रणरंगभूमि रुधिरस्नात होऊं लागल्यानंतर लवकरच त्यांचा अंत झाला. कवीच्या उदयास्तकालाचे

हे देखावे मनांत येऊन एक प्रकारचें कौतुक वाटतें. महाभारतांत 'अठरा' हा आंकडा महत्त्व पावला आहे; तसा प्रस्तुत कवीच्या संबंधानें 'अठ्ठावन' हा आंकडा स्मरणीय झाला आहे. कवीचा जन्म अठ्ठावन सालांत, त्याची आयुर्मर्यादा अठ्ठावन वर्षांची, व त्याचीं काव्यप्रकरणेंही अठ्ठावनच. हा योग केवळ अकल्पित आणि म्हणूनच चमत्कृतिजनक आहे ! मोगरे यांची नोकरी त्यांच्या अठ्ठाविसाव्या वर्षी सुरू झाली व तिला अठ्ठावीस वर्षांचेंच आयुष्य लाभलें, हाही प्रकार आंकड्यांच्या दृष्टीनें याच वर्गातला आहे ! मोगरे यांचें चरित्र त्यांच्या गद्यलेखांसह प्रसिद्ध व्हावयाचें आहे. त्यांत त्यांच्याविषयींच्या गोष्टी वाचकांस सविस्तर वाचावयास सांपडतील. या ठिकाणीं मोगऱ्यांच्या काव्यांविषयींच मुख्यत्वेंकरून लिहावयाचें आहे. त्यांच्या केवळ अनुषंगानेंच त्यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींचा येथें उल्लेख करावा लागेल.

प्रत्येक मनुष्य जात्याच आपआपल्या परीनें कवनें रचणारा असतो. तो आपल्या आयुष्यांत केव्हां तरी, कोठें तरी आणि कसा तरी गुणगुणलेला असतो. पण आपल्या काव्यप्रसूतीचें भान प्रत्येकाला असतेंच असें नाहीं; व ज्यांना ज्यांना असेल त्या त्या सर्वांनींच आपआपल्या काव्यांचा संग्रह केलेला आहे असेंही नाहीं. आपलीं काव्यें लोकांपुढें येण्याचें व त्यांचें रसिकांकडून कौतुक होण्याचें भाग्य फार थोड्यांच्या नशिबीं असतें. असलें भाग्य मोगरे यांस लाभलें, व तेंही त्यांच्या ह्यातींतच, ही गोष्ट फार अभिनंदनीय आहे. कवि व त्याची कृति प्रस्तुत कालापासून अगदीं निकट असतांना जनतेनें त्याच्या काव्यांतील केवळ गुणांचेंच ग्रहण केलें. रसिकांचें गुणैकपक्षपातित्व व कवीचें काव्यप्रणयनपटुत्व हीं अन्योन्यांस शोभविणारीं असल्यामुळें कौतुकास्पद झालीं आहेत.

मोगरे यांच्या सत्राव्या वर्षी त्यांच्या भावि काव्यरचनेचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यांच्या काव्यस्फूर्तीला सुप्रसिद्ध, आबालवृद्धप्रिय, राष्ट्रीयकवि श्रीधर हे कारणीभूत झाले. या कवीची वाणी प्रसन्न, रमणीय व हृदयंगम आहे. ज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानेश्वरी, नाथांचें रामायण व भागवत, तुकोबांची अभंगगाथा, समर्थांचा दासबोध, महीपतीची संतविजयादि

कृति, इत्यादि ग्रंथ त्या त्या संप्रदायाच्या लोकांना मान्य आहेत व त्यांचा त्यांनीं प्रेमपूर्वक आदरही केला आहे. परंतु सर्व संप्रदायांचा दुर्भेद्य कोट फोडून ज्यांनीं महाराष्ट्रांतील प्रत्येक घर काबीज करून त्यावर आपला पूर्ण अंमल बसविला असे एकटे श्रीधरकवीच होत. महाभारत, रामायण व भागवत या परममान्य ग्रंथांचें कुशलतेनें दोहन करून, पांडवविजय, रामविजय, व हरिविजय या परम सुंदर मराठी कृति, मराठी भाषेचा मोठा अभिमान धरून, त्यांनींच निर्माण केल्या; व त्यांच्याद्वारें भक्ति, ज्ञान, व्यवहार, नीति व बोध यांचे धडे त्यांनींच महाराष्ट्रियांस घालून दिले. श्रीधरांच्या 'विजय-'संपत्तीची विस्मृति महाराष्ट्रास कदापि होणें शक्य नाहीं. अशा श्रीधर-कवीच्या वाणीचा संस्कार मोगरे यांच्यावर बाळपणीं प्रथम झाला. 'अभिनव कादंबरी-' च्या एका प्रास्ताविक पद्यांत याविषयीं मोगरे म्हणतात:—

'बाळपणांतचि मजला कवितेचा घालुनी धडा जो दे,
ग्रंथारंभीं आधीं नमितों त्या श्रीधरासि मी मोदें.'

यावरून श्रीधरग्रंथवाचनानें मोगरे यांना प्रथम काव्यस्फूर्ति झाली हें उघड आहे. यानंतर मोरोपंतांच्या काव्यानें त्यांचें मन आकृष्ट झालें. यासंबंधानें ते स्वतां म्हणतात:—

'श्रीधरसा होय मला वंद्य श्रीमन्मयूर कविवर तो.'

यापुढें मोगऱ्यांनीं इतर मराठी कवींचें परिशीलन केलें. अव्वल इंग्रेजीनंतर लवकरच उदयाला आलेलीं संस्कृत काव्यनाटकांचीं भाषांतरें मोगऱ्यांच्या बाळपणीं त्यांच्यापुढें होतीं. शाकुन्तल, उत्तररामचरित, वेणीसंहार, मेघदूत, रघुवंश, मृच्छकटिक, पार्वतीपरिणय, मालतीमाधव, महावीरचरित्र, प्रसन्नराघव, गीतगोविंद, जानकीपरिणय, मुद्राराक्षस इत्यादि विद्वन्मान्य भाषांतरकृति मोगऱ्यांच्या वेळेला प्रचलित होत्या. प्रवेशपरीक्षेपर्यंत इंग्रजीचें अध्ययन झाल्यावर, परिस्थितीच्या अनुरोधानें, मोगरे यांस इ. स. १८८६ सालीं रॉयल एशिआटिक सोसायटीच्या मुंबईच्या शाखेंत नोकरी पतकरावी लागली, व त्यांच्या नोकरीचा शेवट तेथेंच झाला. येथें अस-

तांना त्यांस विशेषेंकरून आंग्लवाङ्मयाचें यथारुचि व यथेच्छ परिशीलन करावयास सांपडलें. एकांताची आवड व सवड, हाताशीं प्रचण्ड ग्रंथ-संग्रह, व काव्यरचनेची हौस, असा त्रिवेणीसंगम झाल्यावर मग काय ? अकालजलवृष्टि जशी चातकाला, पुत्रजन्ममहोत्सव जसा अनपत्य दंपतीला, किंवा आकस्मिक द्रव्यनिधिलाभ जसा अकिंचन पुरुषाला, त्याप्रमाणें मोगऱ्यांना हा परमानंदाचा ठेवा मिळाला. अल्पद्रव्यप्राप्तींत संतोष मानून त्यांनीं शारदोपासना आरंभिली, व तें पवित्र व्रत आमरण चालविलें. आपल्या आयुष्यांत अनेक मधुर काव्यें निर्माण करून त्यांनीं मराठीच्या आधुनिक काव्यवाङ्मयांत सुंदर भर घातली. मोगरे यांच्या आयुर्मर्यादेंत महाराष्ट्रांत अनेक राजकीय, सामाजिक, धार्मिक व वाङ्मयात्मक स्थित्यंतरें घडून आलीं. त्यांतील कांहींचें प्रतिबिंब त्यांच्या काव्यकलापांत दृष्टोत्पत्तीस येतें, आणि तसें होणें अपरिहार्य होतें. साधारणपणें कवि स्वतांच्या कालाचा आदर्श असतो. त्याचें मन जितकें निर्मळ व विशाल असेल त्या मानानें त्याच्या परिस्थितीचें प्रतिबिंब त्यांत स्पष्ट व पूर्णपणें पडत असतें; व त्याचा परिणाम त्याच्या कृतीवर प्रत्यक्ष किंवा परोक्षपणें होत असतो. केवळ भाषांतरकार, रूपांतरकार, आणि स्वकालाविषयीं मूकभाव धारण करणारे कवि मात्र या नियमाला अपवाद होत.

मोगऱ्यांच्या काव्यस्फूर्तीला जरी श्रीधरकवि कारण झाले, तरी त्यांनीं आपल्या काव्याला प्रायः संस्कृत पद्धतीचा वेष दिला. त्यांनीं संस्कृत वृत्तांतच विशेषेंकरून रचना केली. क्वचित् प्राकृत साकी–वृत्ताचा त्यांनीं आदर केला आहे. त्यांची काव्यरचना जुन्या धर्तीवर आहे. त्यांच्या कवितेला इंग्रजी वळण बिलकुल नाहीं, शुद्ध मराठी वळण आहे. त्यांचा श्लोक वामनी थाटावर व आर्या मोरोपंती डौलावर आहे. मोगऱ्यांची भाषा सर्वत्र शुद्ध, सरळ, सुबोध व गोड आहे. तिच्यांत पुष्कळ ठिकाणीं पंतांची टापटीप व सफाई दिसून येते. पौरस्त्य देशांतील पहिल्या प्रतीच्या इंग्रजी थाटाच्या मुंबई शहरांत वसति, सामाजिकसुधारणांविषयांशीं[१] समरसता, व

१. 'सर्व हिंदुधर्माभिमानी लोकांस विज्ञापना', 'अभिनवधर्मस्थापना', 'तापसीबाइ,' क. गोपाळराव आगरकरांवरील उद्गार, 'आनंदीबाई जोशी' 'विष्णुशास्त्री पंडित' इत्यादि प्रकरणें पहा.

राजकारणांतील मंदप्रगतिपर पक्षाशीं सहानुभूति, असा मोगऱ्यांचा योग होता. या योगाशीं सुसंवादी अशींच काव्यें त्यांच्या हातून निर्माण झालीं. मोगरे कोणत्याही चळवळींत प्रत्यक्ष पडत नव्हते. तो त्यांचा स्वभावच नव्हता. त्यांची वृत्ति सात्त्विक व अंतर्मुख होती. दुरून अवलोकन करावें, त्यावर विचार करावा व त्यानंतर जे तरंग मनांत उद्भवतील ते काव्यरूपानें प्रगट करावे, असा त्यांचा परिपाठ होता. मोगरे बोलके नव्हते. शेळक्या मित्रमंडळींत ते केव्हां केव्हां मोकळेपणानें पुष्कळ बोलत असें म्हणतात. परंतु लोकांशीं ते जें कांहीं बोलले तें काव्यरूपानेंच बोलले असें समजावयास हरकत नाहीं. ते प्रगमनशील, सदभिरुचि व मृदुप्रकृति होते. प्रतिक्षणीं नवनव्या कल्पना प्रसवून त्यांच्या उन्मेषांनीं रसिकांस तल्लीन करण्याचें सामर्थ्य, कल्पनेचें औदार्य व विशालत्व, पृथ्वीवर स्वर्ग उभा करण्याचा किंवा स्वर्गावर पृथ्वीला चढविण्याचा पराक्रम, चंडोलासारखें नितांत गूढ गीत गाऊन अस्मानांत भराऱ्या मारतां मारतां सूर्यमंडळाला कवळण्याची क्षमता, विंध्याद्रीच्या प्रचण्ड कड्यांवरून खालीं धडाधड उड्या घेत जाणाऱ्या नर्मदाप्रवाहाचा उद्दामपणा व ओजस्विता, घनघटांचा गंभीर व भैरव ध्वनि, सौदामिनींचा चंचल विलास, जलधरांचा अविरल धारासंपात, श्रावणमासांतील कूलंकष निर्झरिणींचा खळखळाट, या गोष्टी मोगऱ्यांच्या काव्यांत बहुतेक अभावरूपानें प्रकट झाल्या आहेत. वासंतिक मंदपवनानें आंदोलित झालेल्या मंदारमंजरीच्या मरंदाभोंवतीं मंजु गुंजारव करणाऱ्या मिलिंदाशीं मोगऱ्यांचें बरेंच सादृश्य आहे. प्रणयिजनाच्या कुंजकूजनास त्यांची वाणी समर्थ होती;[2] पण त्यांचें मन तयार नव्हतें. कविकुलगुरूचा शृंगारविलास त्यांना विशेष मानवला नाहीं. ' अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम् '

---

१. हल्लीं राजकारणांत मंदप्रागतिक व शीघ्रप्रागतिक असे दोन पक्ष आहेत. पहिल्याचे पुरस्कर्ते ना. सुरेंद्रनाथ बानर्जी, ना. शास्त्री वगैरे आहेत. या पक्षाला पूर्वी मॉडरेट ( नेमस्त ) पक्ष म्हणत. 'रिपनवियोग' वगैरे प्रकरणें पहा.

२ ' माझा संसार, ' व जगदेवचरितांतर्गत लीलावतीविलास पहा.

असें उद्गारणाऱ्या भवभूतीचा करुण त्यांस फार प्रिय झाला असें दिसतें. विरहजन्य शोकाशीं त्यांची वृत्ति तत्काल समरस होई, व तीच त्यांच्या श्लोकप्रसवास अनेक वेळां कारण झाली.[1] रसाच्या दृष्टीनें पाहतां त्यांच्या समग्र कृतींत करुणच मूर्धाभिषिक्त आहे. त्यांच्या परिहासात्मक काव्यांत हास्याचा आविर्भाव बराच[2] आहे. रंजनाचें इतर साहित्य मात्र त्यांच्या काव्यांत विपुल आहे. त्यामुळें त्यांच्या काव्यवन-स्थलीमध्यें संचार करणाऱ्या सहृदयांस मोठा संतोष होतो. ज्यांतील भूमि मालाकारानें साफसूफ केली आहे, ज्यांत बालवृक्ष योग्य अंतरावर लाविले असून त्यांवर विविध कोमल वल्ली सोडून दिल्या आहेत, ज्याच्या परिसरांत पाटांचें पाणी झुळझुळ वाहात आहे, ज्यांत प्रफुल्ल कमलांची पुष्करिणी आहे, ज्यांत चिमुकले लताकुंज उभविले आहेत, ज्यांत लघु व रम्य संचारपथ निर्मिले आहेत, ज्यांत विश्रांति घेण्याकरितां विरल सुखासनें मांडिलीं आहेत, ज्यांत चित्रविचित्र फुलांच्या कुंड्या रेखीव पद्धतीनें ठेविल्या आहेत, व दक्षिणानिलाच्या मंदगतीवर व प्रसन्न कटाक्षांवर ज्याचें जीवित व सौभाग्य अवलंबून आहे, असें सुंदर उपवन मोगऱ्यांच्या काव्यप्रणयनाला योग्य उपमान होय असें आम्हांला वाटतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, मोगऱ्यांची कविता मोगऱ्यांच्या फुलांसारखी आहे. तिच्यांत मोगऱ्याचा गंध व सत्त्वगुणाशीं जुळणारा त्याचा धवलिमा आहे. मोगऱ्याच्या फुलांत चंपकाची स्वर्णवर्णाची चमक व उद्दाम गंधाची धमक नाहीं, पारिजाताचें किंवा जातिकुसुमाचें नितांत मार्दव नाहीं, गुलाबाची प्रौढी व नखरा नाहीं, केतकीचा परिमलगर्भ अहंकारही नाहीं. पण हे गुण मोगऱ्याच्या फुलांत नाहींत हा त्या फुलाचा दोष नसून तें फूल उत्पन्न करणाऱ्या विधात्याच्या इच्छेचा विलास आहे, असें आम्हांस वाटतें.

---

१. कोल्हापूरचे चवथे शिवाजीमहाराज यांवरील विलापपद्यें व इतर विरहविलाप पहा.

२. ‘पदवीचा पाडवा,’ ‘मेथाजींची मजलस,’ व ‘अभिनवधर्मस्थापना,’ हीं प्रकरणें पहा.

कित्येक सुप्रसिद्ध मराठी काव्यप्रणेत्यांत कांहीं विशेष प्रमुखत्वानें नजरेस येतात. उदाहरणार्थ, कृष्णशास्त्री चिपळुणकरांत कटाक्षवीक्षण, परशुरामपंततात्यांत आर्यपतिव्रतेची शालीनता, चिंतामणिपेठकरांत मंदविलास, पांडुरंगशास्त्री पारख्यांत श्लेषप्रीति, महाजनींत मार्मिकता, लेंभ्यांत शब्दशय्येचें मार्दव, आठल्यांत नोकझोंक, विद्याधरपंत भिड्यांत शब्दसंस्कृति व बोधपरता, आगाशांत चातुर्य व शब्दचमत्कृति, टिळकांत सहजता व प्रेमळपणा, केशवसुतांत ओजस्विता व उद्दीपकता, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांत कल्पकता, केळकरांत रसिकता, पांगारकरांत भक्तिप्रवणता, चंद्रशेखरांत माधुर्य व सहृदयता, सुमंतांत वीणाकाव्याची चमक, माधवानुजांत मधुकरवृत्ति, माधवराव मोडकांत पंडितगिरी, बाळकृष्ण अनंत भिड्यांत अस्खलित व जोरदार काव्यौघ, घाट्यांत रंगेलपणा, विनायकांत हृदयभेदकत्व व गोविंदाग्रजांत वृत्तिचांचल्य. अर्थात् उपरिनिर्दिष्ट कवींत दुसरे कोणतेही गुण नाहींतच असें समजण्याचें कारण नाहीं. माधुर्य, प्रसाद आणि परिष्कृति ( Finish ) हे गुण मोगऱ्यांच्या काव्यांत ठळकपणानें दृष्टीस पडतात.

शब्द, अर्थ, वाक्य, रस, छंद, प्रसंग, कल्पना इत्यादि संबंधाचे सर्व प्रकारचे दोष अनौचित्य या नांवाखालीं मोडतात. रसाचा अपकर्ष करणाऱ्या आणि रसिकास उद्वेग आणणाऱ्या सर्व गोष्टी अनुचित होत. संस्कारानें मनुष्यांत सदभिरुचि उत्पन्न होते. संस्कारभेदानें किंबहुना एकाच संस्कारानें सुद्धां क्वचित् रुचिभेद उत्पन्न होतो. परंतु असल्या रुचिभेदांत रुचिविषयाच्या तात्त्विक स्वरूपासंबंधानें भेद नसून त्या विषयाच्या प्रेमाच्या प्रमाणासंबंधानेंच केवळ तो भेद संभवतो. हा मुद्दा विशद करण्याकरितां एक साधें उदाहरण घेऊं या. आंबा, द्राक्ष, डाळिंब, अंजीर, व फणस या पदार्थांत माधुर्य हा गुण सर्वसाधारण आहे. ज्याचें रसनेंद्रिय विकृत नाहीं अशा प्रत्येकाला हा गुण पटण्यासारखा आहे. परंतु हे सर्वच पदार्थ सर्वांना सारखेच आवडत नाहींत, कमीजास्त प्रमाणांत आवडतात, हें अनुभवसिद्ध आहे यालाच रुचिवैचित्र्य म्हणतात. पूर्वोक्त पदार्थांच्या आवडीचें प्रमाण मात्र

यांत भिन्न आहे. त्यांतील सर्वसाधारण गुण जो माधुर्य त्याविषयीं सर्वांचें मत एकच आहे. रसनेंद्रियाचे विषय व व्यापार उत्तान असल्यामळें सहज समजतात. हृदय व बुद्धि:या इंद्रियांचे खेळ गूढ व दुर्बोध असतात. यामुळें त्यांच्या कार्याविषयीं रुचिभेदाला अधिकच अवसर मिळतो. काव्य हा विषय भावनाप्रधान असल्यामुळें त्यांत भावनांचें अधिष्ठान जें हृदय त्याची मोठी प्रतिष्ठा असते. तथापि विषयांचें ज्ञान बुद्धिग्राह्य असल्यामुळें बुद्धीच्या साहाय्याशिवाय एकटें हृदय लंगडें पडतें. केवळ बुद्धि किंवा केवळ हृदय काव्यप्रसवास सर्वथा असमर्थ आहे. दोहोंच्या संगमानेंच काव्य जन्माला येतें. सदभिरुचीच्या मुळाशीं बुद्धि व हृदय दोन्हीं असतात. या दोहोंना योग्य संस्कार झाल्यावांचून सदभिरुचि उत्पन्न होत नाहीं; व ती उदित झाल्याशिवाय उचित व अनुचित यांतील भेद जाणण्याचें सामर्थ्य मनुष्यांत येत नाहीं. आलीकडील काव्यनाटकवाङ्मयांत अनौचित्य हा दोष विशेष दिसून येतो ही खेदाची गोष्ट आहे. कविनिरंकुशतेच्या नांवाखालीं अनौचित्याचें समर्थन करण्यांत येतें, ही गोष्ट तर अधिकच उद्वेगजनक आहे. कवीचा निरंकुशपणा हा अधिकार अत्यंत पवित्र, उज्ज्वल, अपरिच्छिन्न व चिरंतन आहे. निसर्गदेवतेनें त्याला तो प्रसन्न मनानें बहाल केला आहे. श्रीमदान्धांचा उन्माद, बलिष्ठांचा दर्प, व खलांची राक्षसी महत्त्वाकांक्षा यांना कांटेरी लगाम घालण्याकरितां हा अधिकार कवीला मिळाला आहे. सत्याचें साम्राज्य, नीतीचा विजय, सदाचरणाचा उत्कर्ष, सज्जनाचा उद्धार, सद्धर्माचें प्रतिपालन, सौंदर्याचें अभिनंदन, सात्त्विक प्रेमाचें मंडन, अनिर्वचनीय आनंदाची प्राणप्रतिष्ठा, इत्यादि उदात्त कार्यें घडवून आणण्याकरितां हा अधिकार कवीला देण्यांत आला आहे. जगांतील महाभाग कवींद्रांनीं हा अनिरुद्धपणें व निःशंकपणें गाजविला आहे. यावर कोणाही पार्थिव अधिकाऱ्याची सत्ता चालत नाहीं. अशा प्रकारें हा अधिकार स्वायत्त, अनियन्त्रित व अमर्याद असल्यामुळें निरंकुशत्व या यथार्थ नांवानें प्रसिद्ध आहे. गवयाला जसा अपस्वर, पतिव्रतेला जसा लोकापवाद, मानी पुरुषाला जसें पारतंत्र्य, तसें कवीला अनौचित्य अत्यंत दुःसह असतें. अनौचित्याच्या भंगाचें पातक तो कदापि करीत नाहीं, धनाचें मोल घेऊन रडत

नाहीं, मित्रप्रशंसेवर जगत नाहीं, व खलनिंदेनें मरत नाहीं. अनौचित्य हा मोठा काव्यदोष असून तो निरंकुशत्वाशीं अगदीं विसंवादी आहे. अनौचित्याचे ठळक प्रकार मोगरे यांच्या काव्यांत दृष्टीस पडत नाहीत,ही संतोषाची गोष्ट आहे. त्याच्यांत कोठें कोठें क्षुद्र गोष्टींना फाजील महत्त्व देण्यांत आलें आहे व वर्णनांत अत्युक्ति[1] आली आहे. असल्या गोष्टींचें भान कवीला नाहीं असें नाहीं. तथापि तो प्रकार त्याच्या मतानें समर्थनीय आहे. आमचे फारां दिवसांचे रसिक मित्र कै. हरि नारायण आपटे[2] यांनीं 'मोगऱ्याचीं फुलें, गुच्छ तिसरा' याची प्रस्तावना लिहिली.तिच्यांत मोगरेकृतींत ध्वनिकाव्य फार विरळ आहे असें त्यांनीं म्हटलें, तें सामान्यत: खरें आहे. मोगऱ्यांचीं प्रासंगिक किरकोळ काव्यें पुष्कळ आहेत. त्यांच्याऐवजीं यांनीं एकादें मोठें काव्य निर्मिलें असतें तर मराठी काव्यवाचकांस मोठा लाभ झाला असता असें पुष्कळांचें मत आहे.

मोगरे यांची एकंदर काव्यसंपत्ति या पुस्तकाच्या साच्याचीं चारशें साडेचारशें पृष्ठें व्यापील एवढी आहे.पदवीचा पाडवा,वृंदा, जगद्देवचरित, आर्यभूपर्यटन, बुद्धजन्म, महाराष्ट्रजनविलाप, अभिनवकादंबरी व रिपनवियोग हीं त्यांचीं काव्यें त्यांच्या कृतींत मोठीं गणण्याजोगीं आहेत.यांशिवाय बाकीचीं अनेक लघुकाव्यें आहेत. मोगरे, त्यांचें कवित्व व त्यांचीं काव्यें, इतक्या गोष्टींविषयीं येथपर्यंत सामान्य विचार झाला.आतां आपण त्यांचा

## ( २ ) प्रस्तुत काव्यकलाप

कसा आहे याचें निरीक्षण करूं. आरंभीं सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत काव्यकलापांत कवीचा दुसरा व पांचवा असे दोन गुच्छ, त्यांचीं

---

१ 'आनंदीबाई जोशी,' 'तापसीबाई' 'विजयिनीविजयाष्टक,' इत्यादि प्रकरणें पहा.

२ हरिभाऊंनीं आपली प्रस्तावना मुद्रित होण्यापूर्वीं आम्हांस अनेकवार मित्रप्रेमास्तव दाखविली होती. तिच्यांतील कांहीं मुद्द्यांसंबंधानें, विशेषत: मोगऱ्यांच्या परिहासकाव्यांसंबंधानें, आमच्यांत पुष्कळ चर्चा झाली. आमची ही प्रस्तावना पाहण्यास व तिच्याविषयीं रसिकपणानें विचार प्रकट करण्यास हरिभाऊ हयात नाहींत हें मनांत येऊन परम खेद वाटतो !

'अभिनवकादंबरी,' व 'मराठी ग्रंथकारांस प्रार्थना,' इतकी कविता मोडते. हा काव्यकलाप मोगऱ्यांच्या एकंदर कृतीचा तृतीयांश आहे.यांत भाषांतर अथवा रूपांतर या स्वरूपाचा एक भाग व स्वतंत्र कविता हा दुसरा भाग. प्रथम

## ( अ ) भाषांतरात्मक रचना

कशी आहे ती पाहूं. 'अभिनवकादंबरी,' 'बुद्धजन्म,' ( गुच्छ दुसरा. ), व 'वाग्युद्ध,' ( गुच्छ ५ वा ), ही भाषांतरात्मक कृति आहे. मूळ कवीच्या कल्पनांवर व संविधानकचातुर्यावर भाषांतरकाराचा हक्क नसतो. मूळ ग्रंथांतलें हृद्गत सरस रीतीनें अन्य भाषेंत उतरणें हें भाषांतरकाराचें खरें काम आहे. कै. कृष्णशास्त्री चिपळुणकर यांनीं, दक्षिणा—प्राइझ-कमिटीचे सेक्रेटरी या नात्यानें, जानकीपरिणय नाटकाच्या भाषांतराची फार तारीफ केली. त्यांच्या चिरंजीवांनीं आपल्या 'भाषांतर'—निबंधांत मेघदूत व रघुवंश यांच्या भाषांतराचें विशेष कौतुक केलें. 'अभिनवकादंबरी' व 'बुद्धजन्म' या दोन्ही कृति भाषांतराच्या दृष्टीनें वरील भाषांतरग्रंथांपेक्षां कमी योग्यतेच्या खचित नाहींत. त्र्यंबकक्षेत्रनिवासी धुंडिराज—कवि यानें 'कविताकामिनी'—चा 'पंचबाण' जो बाण कवि त्याच्या रसिकवंद्य कादम्बरीग्रंथाचें सुंदर सार संस्कृत आर्यांत आणून ठेविलें. कादंबरीचें संविधानक फार गुंतागुतीचें आहे. समग्र ग्रंथ वाचून तें नीट बसविणें हें काम श्रमाचें व चातुर्याचें आहे कथेंतील वर्णनात्मक भाग गाळून केवळ कथासूत्र, विच्छिन्न होऊं न देतां, सरस रीतीनें त्यानें निबद्ध केलें आहे. या धुंडिराजकृतीचें मोगऱ्यांनी मराठींत आर्यावृत्तांत शुद्ध, सरस व प्रौढ भाषांतर केलें आहे. डॉ. भांडारकरांसारख्या विख्यात पंडितांनीं त्याचें कौतुक केलें आहे. चंद्रापीड व महाश्वेता यांची भेट, महाश्वेतेची जन्मकथा, पुंडरीकवृत्तांत, महाश्वेतेची मुनिदीक्षा, चंद्रापीड व कादंबरी यांचा समागम,इत्यादि प्रसंग वाचकांनीं पाहावे म्हणजे मोगऱ्यांच्या भाषांतरकुशलतेची त्यांस साक्ष पटेल. 'बुद्धजन्म' प्रकरण मोगऱ्यांनीं सर एड्विन् आर्नोल्ड यांच्या 'लाइट ऑफ एशिया' नामक काव्यावरून मराठींत उतरलें. हें समग्र काव्य मराठींत

उतरण्याचा कवीचा संकल्प होता; परंतु दुर्दैवानें बुद्धजन्मप्रसंगापलीकडे त्याची मजल गेली नाहीं ! संस्कृताचें मराठी करणें हें काम कांहीं अंशीं सोपें आहे. कारण त्या दोन भाषांमध्यें जन्यजनकसंबंधमूलक सादृश्य तरी आहे; परंतु इंग्रेजी व मराठी या भाषांत इतकें वैषम्य आहे कीं, एकीचें दुसरींत यथावत् भाषांतर करणें हें काम बरेंच दुष्कर आहे. सदाशिव काशिनाथ छत्रे, हरि केशवजी व कृष्णशास्त्री चिपळुणकर यांचा भाषांतरकार म्हणून मोठा लौकिक आहे. हे सगळे इंग्रेजी गद्याचें मराठी गद्य करणारे होते. इंग्रेजी पद्यात्मक ग्रंथाचें मराठींत पद्यात्मक भाषांतर करणें हें काम तर मोठेंच दिव्य आहे. माधवराव मोडकांसारखे कुशल कारागीर मात्र यांतून सुखरूप पार पडलेले दिसतात[1] ! मोगरे यांचें 'बुद्धजन्म–' काव्य फारच सुंदर उतरलें आहे. तें वाचीत असतां आपण स्वतंत्र मराठी काव्य वाचीत आहों असेंच वाटतें. त्याचा वेष जुना, त्यांतल्या कल्पना जुन्या, त्याचा आत्मा जुना, व त्याची भाषा शुद्ध मराठी वळणाची ! इंग्रेजी खाणींतून बाहेर काढिलेल्या या रत्नाला जन्मभूमीचा गंधसुद्धां नाहीं ! हें काव्य लहानच पण प्रौढ व रसाळ आहे. यांतील कित्येक श्लोक वाचीत असतां सहृदय वाचकांना वामन व रघुनाथ या पंडितद्वयाच्या रम्य कृतींची आठवण झाल्याखेरीज राहणार नाहीं. 'वाग्युद्ध' हें प्रकरण होमर कवीच्या 'ईलियड–' काव्यावरून मराठींत रचिलें आहे. ही कृति 'बुद्धजन्म–' काव्याइतकी सुंदर नाहीं. आतां कवीची

## (ब) स्वतंत्र रचना

पाहूं या. 'मराठी ग्रंथकारांस प्रार्थना,' 'कन्यादान,' (गुच्छ दुसरा), 'शारदोत्सव' (गुच्छ ५ वा), 'महाराष्ट्रजन–विज्ञापना' (गुच्छ ५ वा), व 'मंगलाचरण' (गुच्छ ५ वा), हीं प्रकरणें एका जातीचीं आहेत म्हणून तीं एकत्र घेऊं या. यांतील पहिल्या प्रकरणांत कवीनें मातेपेक्षां मातृभाषा अधिक योग्यतेची आहे, ही गोष्ट

---

१ व्हिकार ऑफ वेकफील्ड कादंबरींतील 'हर्मिट'काव्याचें भाषांतर व 'सुख व शांति–' ग्रंथांतील पद्यरूप भाषांतरें पहा.

व्यतिरेकालंकाराचा अवलंब करून चातुर्यानें सांगतली आहे. राजाश्रयाची अपेक्षा न करितां,जनाच्या निंदास्तुतीची परवा न करितां, केवल कर्तव्य म्हणून ग्रंथरचना करा व सदभिरुचि निर्माण करून निरपेक्षपणें सरस्वतीची उपासना करा, म्हणजे

‘ जे झांकितातित संप्रति येतां पाहुनि तुम्हांस दरवाजे
कीर्त्यर्थ तेहि तुमच्या भजनीं रततील छत्रधर राजे. ’

असें आशावादपूर्ण गोड भविष्य या कवितेंत कवीनें वर्तविलें आहे.

प्रस्तुत कवि राजाश्रयाचा केव्हांही भुकेला नव्हता. तथापि राजाश्रय व कविकृति या अन्योन्यांसच नव्हे तर परंपरया सर्व जनतेलाही भूषणास्पद होत, असें कवीनें ‘ कन्यादान–’ काव्यांत रसिकपणानें दर्शविलें आहे. ‘ शारदोत्सव ’–पद्यांनीं शारदेचें अधिष्ठान जे ग्रंथ त्यांचें माहात्म्य वर्णिलें आहे. सन १९०९ सालीं बडोदें शहरीं श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या महनीय व उदार आश्रयानें ‘ महाराष्ट्रसाहित्यसंमेलन’ भरलें होतें.या संमेलनाच्या सभासदांस मोगरे यांनीं एक पद्यात्मक विनंती-पत्र पाठविलें होतें. त्याचें नांव ‘ महाराष्ट्रजनविज्ञापना ’ असें आहे. या काव्यांत मोगऱ्यांचा मराठी भाषेविषयींचा असीम अभिमान उत्कटपणें व्यक्त झाला आहे. या दृष्टीनें ही कविता फारच महत्त्वाची आहे. हिंदी, उर्दू वगैरे भाषांचे हल्ले मराठीवर होत आहेत ही गोष्ट कवीनें पूर्वोक्त संमेलन--सभासदांच्या निदर्शनास गंभीरपणानें आणिली आहे, व मराठीला स्थानभ्रष्ट करण्याचा कित्येकांचा प्रयत्न उघडकीस आणिला आहे. हिंदी मृदु व मधुर असेल, उर्दूसारखी दुसरी नटवी भाषा नसेल, बंगालीचें पाऊल वैचित्र्यांत पुढें असेल, गुजराथीचा मुग्धपणा लोभनीय असेल, कर्नाटकीचें कलावतीत्व रसिकसंमत असेल, तेलगू ‘ ललित’–संज्ञेस पात्र असेल, आंग्लभाषेचा साहित्यसंपत्तीचा डौल यथार्थ असेल; परंतु सात्त्विक, शुद्ध व उदात्त स्वरूप एका मराठीचेंच आहे, असें मोगरे कवि या कवितेंत अभिमानपूर्वक प्रतिपादीत आहेत. समररंगीं दर्भधरांस खड्गधर बनविण्याचें सामर्थ्य मराठींत

आहे; तिनें ज्ञानेश्वरमुखानें गूढ गीतार्थ विशद केला; तिनें नाम्या शिंप्याकडून ब्राह्मणांस भगवद्भक्तीचा ओनामा पढविला, व त्यांस वर्णगुरुत्व संपादन करून दिलें; नामदेवाची बटीक जनी हिच्याच बळावर महाराष्ट्राला वंदनीय झाली; भगवंताच्या घरीं उच्चनीच भाव नाहीं हें उदात्त महाराष्ट्रधर्मतत्त्व नाथांच्याद्वारें हिनेंच जाहीर केलें; नाथांच्या नातवाकडून हिनेंच सुधेचें कोडें[1] पुरविलें; तेली, वाणी, उदमी वगैरे अठरापगड जातीचे लोक हिनेंच मोहून टाकून तुकयाभोंवतीं रंगशिलेवर नाचविले; संस्कृताचा अभिमान टाकून रसपंडित वामन हिचाच नम्र सेवक होऊन राहिला; अष्टोत्तरशत रामायणें लीलेनें गाण्याचें सामर्थ्य हिनेंच मयूरपंडिताला दिलें; ऐक्याचें बीज महाराष्ट्रांत पेरणारी हीच; श्री–शिवाजीमहाराजांना स्फुरण देणारी भवानी हीच; मोंगलबादशाहीच्या बड्या सिंहासनाला कांपविणारी सत्ता हीच; फार काय पण

'हीच मराठ्यांकडुनी अटकेपर्यंत नेउनी कटका
फडकावयास लावी सिंधुनदीच्या तटीं जरीपटका.'

असे मराठी–भाषेसंबंधाचे उद्गार कवि मोठ्या सहृदतेनें काढीत आहे. अशा योग्यतेच्या मराठी भाषेच्या अपकर्षाचीं चिन्हें दिसत आहेत असे नुसते शब्द देखील उच्चारण्यास कवीची वाणी कचरत आहे! मराठीची दुर्दशा करणाऱ्या बंधूंना मोगरे सात्त्विक त्वेषानें म्हणतातः—

'होते अजाण म्हणुनी लिहिल्या बखरीच मात्र वडिलांनीं,
खणिल्या परंतु सांगा साहित्याच्या तुम्हीं किती खाणी?'
'असतां तुम्ही निरंतर आंग्लकथाकाव्यनाटकीं दंग
वक्तृत्वासहि तुमच्या चढत नसे इंग्रजीविना रंग.'
'पत्रें निरोप आज्ञा तुमच्या त्या इंग्रजींतची जाती,
वाटे लाज तुम्हांला ग्रंथ मराठी धरावया हातीं.'
'लेखन वाचन मनन ध्यान सदा इंग्रजींतची चाले,
किंबहुना मन तुमचें आहे संपूर्ण इंग्रजी झालें.'

---

१. प्रत्यक्ष अमृत प्रसन्न होईल अशी कविता करविली.

‘ तुमच्या जन्ममहीची मालवतां हीच जीवनज्योति,
राहील जीव धरुनी केविं महाराष्ट्रभूमिका हो ती ?’

राजाश्रयाच्या अभावीं मराठीची अवनति होत आहे असा कोणी बुद्धिवाद करितात, तो मोगऱ्यांस विलकुल पसंत नव्हता. त्यांवर त्यांचा अशा अर्थाचा कोटिक्रम आहे:—ज्ञानेश्वरांनीं रामचंद्रदेव राजाच्या इनामाच्या लालचीनें ज्ञानेश्वरी तयार केली काय? एखाद्या लक्ष्मीपतीला किंवा लक्ष्मीपुत्राला प्रसन्न करण्याकरितां नामा अभंगरंगांत दंग झाला काय? जाहिर बक्षिसाच्या लोभानें नाथांनीं ग्रंथरचना केली काय? मुक्तेश्वरांनीं राजद्वारीं पाऊल तरी ठेविलें काय? छत्रपतीच्या मर्जीचा कल पाहून समर्थांची लेखणी स्फुरण पावली काय? तुकया स्वतां वाणी असूनही त्यानें वाणीचा विक्रय शिवबापाशीं कधीं केला काय? ‘ भरत भाव’—प्रकरणांत ओतलेला भाव वामनानें कोणत्या राजसभेंत संपादन केला? पंतांच्या वाग्वल्लीला कोणत्या राजाच्या धनवृष्टीनें सिंचिलें? या प्रश्नांचीं उत्तरें जर नकारात्मक येतील, तर राजाश्रयाच्या अभावानें मराठी मरणोन्मुख झाली या म्हणण्यांत अर्थ कोणता? या प्रकरणाच्या शेवटीं मोगरे म्हणतात:

‘ हा न धनाचा महिमा, भक्तीचा खेळ होय हा सारा.’

हें अगदीं खरें आहे. भाषेवरील प्रेम व शारदोपासनेची आवड याच गोष्टी ग्रंथरचनेस मुख्यत्वेंकरून कारण होतात. भाषेच्या उद्धारानें व्यक्ति, जनता व राष्ट्र या सर्वांचा उद्धार होतो, असें उदात्त तत्त्व मोगरे यांनीं या काव्यांत प्रतिपादिलें आहे. ‘ महाराष्ट्र-साहित्यपत्रिका ’ विविधज्ञानविस्तारांत अवतीर्ण झाली, तिचें ‘ मंगलाचरण ’ मोगरे यांनीं केलें. त्यांत शारदासेवेचें महत्त्व व पावित्र्य त्यांनीं सुंदर रीतीनें वर्णिलें आहे.

‘ वधूवरांस संदेश,’ ‘ माझा संसार,’ आणि ‘ गृहस्थाश्रम,’ हीं काव्यें सामाजिक स्वरूपाचीं आहेत. पहिलीं दोन प्रस्तुतच्या गुच्छांत असून शेवटचें दुसऱ्या गुच्छांत आहे. पहिल्यांत सासरीं जाणाऱ्या कन्येस पित्याचा सप्रेम निरोप व शेवटीं वधूवरांस योग्य उपदेश आहे. दुसरें काव्य

अपूर्ण आहे. यांत संसारांतील रहस्य जें प्रेम तें विशद करण्याचा कवीचा हेतु असावा असा तर्क आहे. तिसऱ्या काव्यांत गृहिणी व गृहस्थ यांची कर्तव्यें फार सुंदर रेखाटलीं आहेत. यावरून कवीची संसाराची कल्पना मधुर व उदात्त असावी असें दिसतें. आणि संसार मधुर व रमणीय करण्याचें काम कवीचेंच आहे. सत्य, धर्म, न्याय, प्रेम, सदाचार, उद्यम इत्यादि सद्गुणांचा उपदेश यांत फार मार्मिकपणानें व प्रेमळपणानें केला आहे.

'जगद्देवचरित्र' (गुच्छ दुसरा), व आर्यभूपर्यटनांतील 'हिंदुस्थानावर शिकंदराची स्वारी' (गुच्छ दुसरा), हीं दोन्हीं काव्यें ऐतिहासिक समजण्याला हरकत नाहीं. हीं दोन्हीं काव्यें अपूर्ण आहेत. याबद्दल रसिकांस खरोखर मोठा खेद वाटेल. पहिल्या काव्यांत बहुपत्नीक पतीचें शील हळू हळू कसें भ्रष्ट होतें हें दर्शविलें आहे. त्यांतील लीलावतीच्या लीला तिरस्करणीय वाटतात व चारुशीलेचा अपमान कारुण्यास्पद होतो. दुसऱ्या काव्यांत अनेक रमणीय स्थळें आहेत. त्यांचा आस्वाद वाचकांनीं अवश्य घ्यावा अशी आम्ही शिफारस करतों.

'सह्याद्रि' ही द्वितीय गुच्छांतील कविता अनक दृष्टींनीं मनोरम आहे. ही वर्णनात्मक आहे. हिच्यांत हिरकणीचें तेज चमकत आहे. कल्पनेची मौज, वर्णनाची ऐट, स्वभावोक्तीचें माधुर्य, हीं सर्व या लहानशा कृतींत एकवटलीं आहेत. अद्रीचें उन्नतत्व; त्याच्या खोल व भयंकर दऱ्या; त्याच्या अंकावर खेळणाऱ्या 'मुलींचे लळे;' शारदेंदुकिरणांना लाजविणारीं त्यावरील स्फटिकप्रभ सरोवरें; शिवमाहात्म्याचा घोष करीत त्याच्या अंकावरून खालीं उडया टाकणाऱ्या गोदावरी, कृष्णा व पंचगंगा या नद्या, सप्तशृंगीचें अंबिकालय व बौद्धादिकांच्या विस्मयोत्पादक कृति, यांविषयीं या काव्यांत अतिसंक्षिप्त परंतु नितांत मधुर उल्लेख आला आहे. नंतर शिवरायाचे प्रचंड यशःस्तंभच असे अनेक गड कवीचा दृग्विषय झाले. त्यामुळें शिवराय, जावळीचा कवि, तानाजी, छत्रपतींचे मावळे गडी, प्रतापगड, रायगड, सिंहगड, विजयी वाघनखें व भगवा प्रतापी झेंडा, यांनीं कवीच्या प्रेमतरल अंतरंगांत एकदम गर्दी करून सोडिली ! पूर्ववैभवाची स्मृति होऊन कवीचा काव्य-

रचनानंद मावळूं लागला. शेवटीं खिन्न मनानें कवीनें वर्ण्य-विषयाचा म्हणजे सह्याद्रीचा निरोप घेतला आहे. हें काव्य फार लहान पण मोठा चटका लावून सोडणारें आहे. चलच्चित्र–देखाव्यांमध्यें ज्याप्रमाणें शेकडों चित्रें अत्यंत अल्प अवकाशांत डोळ्यांसमोरून भराभर निघून जातात व प्रेक्षकांस थक्क करून सोडतात, त्याप्रमाणें या लघु-काव्यांत पूर्वोक्त प्रसंगांचे सुंदर व चटकदार देखावे पाहून रसिकांतःकरण तल्लीन होतें व कवीबरोबर मोठ्या दुःखानें सह्याद्रीचा निरोप घेतें. स्वराष्ट्राविषयीं व विशेषतः शिवाजी महाराज, समर्थ, तानाजी व इतर शिवराजनिष्ठ मावळे यांच्याविषयीं मोगरे यांचें अत्युत्कट प्रेम या लहानशा काव्यांत व्यक्त झालें आहे. महाराष्ट्रांत इतिहासदेवतेचें अत्यंत हृदयंगम विहारस्थल सिंहगड होय. तानाजी–नरसिंहाच्या अतुल पराक्रमानें पवित्र व उज्ज्वल झालेल्या त्या स्थानावर आतां कोल्हेकुई माजली आहे, असें कालाचें कठोर विलसित पाहून कवि अत्यंत उद्विग्न झाला आहे! आणि कोणता देशभक्त असलें खेदजनक स्थित्यंतर पाहून विषण्ण होणार नाहीं? शिवाजी महाराज, तानाजी, बाजी देशपांडे, अहिल्याबाई, लक्ष्मीबाई अशा विभूतींकडे आमच्या कवीची दृष्टि वळली असती तर त्यानें राष्ट्रीय प्रेमाची ज्योति निरंतर जागृत ठेविली असती यांत संशय नाहीं.

'माझें झाड' (गुच्छ ५ वा) ही कविता अन्योक्ति आहे असें मानिलें तर ती ध्वनिकाव्याचें सुंदर उदाहरण समजण्याला हरकत नाहीं. तिच्यांत प्रतिबिंबित होणारी देशभक्ति अमोल आहे. देशावर घाव घाल-णारांचा कवीनें या पद्यांत तीव्र निषेध केला आहे. संकटावस्थेंत दिङ्-मूढ झालेल्या माणसाला परमेश्वराचें स्मरणच खरी शांति देणारें आहे, हा अनुभव 'दुःखिताचें समाधान' (गुच्छ ५ वा) सांगत आहे. अण्णा किर्लोसकरांच्या अभिनंदनलेखांत राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पुढील पद्य विशेष महत्त्वाचें आहेः–

'आणा तो रंगभूमीवर यवनवनज्वालमाली शिवाजी,
येऊं द्या तोहि बाजी निशिदिनिं विजयश्री जया होय राजी;

पाहूं द्या एकदां ते भट अटक नदी लंघितां राघवाचे
रंगीं तो कां न नाचो टिपुसि रगडितां जो रणीं फार नाचे ?

नाटकसंस्था समाजशिक्षणाची उत्तम शाळा आहे अशा दृष्टीनें या उपदेशाचें महत्त्व आहे. हल्लीं देखील अशा उपदेशाची अपेक्षा नाहीं असें नाहीं. वेंकटाध्वरि–कवीनें आपल्या विश्वगुणादर्श–काव्यांत संस्कृत विद्येची अवनति वर्णिली आहे, तिचीच हुबेहुब छाया ' भिक्षुक ( गुच्छ ५ वा ) या चुटक्यांत दिसून येते. धनिकाचे भोवतीं धनलोभानें हलकट लोक कसे गोळा होतात व धनापहार करण्याकरितां कसे कपटप्रबंध रचितात ही गोष्ट 'काकांची कानउघाडणी'–वरून व्यक्त होते. देवाच्या अस्तित्वावर व अतुल सामर्थ्यावर कवीची अचल निष्ठा होती, असें 'देव म्हणजे काय ?' (गुच्छ ५ वा ) या कवितेवरून निदर्शनास येतें. सद्गु-णांचे तीळ व प्रेमाचा पाक यांचें मधुर मीलन ' संक्रांतीचा तिळगुळ ' ( गुच्छ ५ वा ) करीत आहे. स्वकीयांच्या गुणांचें अभिनंदन करण्याची कवीची प्रवृत्ति ' अभिनंदन–' पद्यांवरून दिसून येत आहे. बाजीराव रघुनाथ ऊर्फ रावबाजी यांचा व यांच्यावर पोसल्या जाणाऱ्या लोकांचा खरमरीत समाचार 'बाजीराज्यवियोग' ( गुच्छ ५ वा) घेत आहे. इतर प्रासंगिक प्रकरणांचा विशेष परामर्श घेण्याचें प्रयोजन नाहीं.

आमचे दुसरे संमाननीय मित्र रा. रा अच्युतराव साठे या सहृदय विद्वान् गृहस्थांनीं मोगऱ्यांच्या चवथ्या गुच्छावर वाचनीय उपोद्घात लिहिला आहे. त्यांत त्यांनीं कवीचें चतुरंग बल सांगितलें आहे तें असें: छंदप्रबंध,शब्दमौक्तिकभांडार,अलंकारदृष्टान्तादि सामग्री,व मुख्य ध्येयाची कथानुसन्धानानें घटना. यांत आम्हांला थोडा फरक करावासा वाटतो. छंदप्रबंध हें अंग आमच्यामतें काव्यास आवश्यक नाहीं. बहिरंगाविषयीं काव्य नेहमीं निरपेक्ष असतें. बाणकवीची कादंबरी वाचतांना याचा प्रत्यय पदोपदीं येतो. छंदप्रबंधरूप अंगाऐवजीं कल्पनाप्रसवशक्ति हें अंग चतुरंगबलांत निविष्ट झालें पाहिजे. हा गुण काव्याचें केवळ जीवन आहे. कल्पनेशिवाय चमत्कृति नाहीं; चमत्कृतीशिवाय चारुता नाहीं; चारुते-शिवाय आनंद नाहीं; आनंदाशिवाय काव्याची चरितार्थता नाहीं वर्ण्य-

विषयांशीं कवीचें तादात्म्य तर पाहिजेच; परंतु कवींत जर कल्पनाशक्ति किंवा प्रतिभाशालित्व नसेल, तर त्याचे इतर सर्व गुण निर्धन माणसाच्या अंगच्या गुणांप्रमाणें निष्प्रभ व समर्थांच्या जोरदार शब्दांत म्हणावयाचें तर ‘ करंटे ’ होत. मोगऱ्यांना साठे यांचें पूर्वोक्त चतुरंगबल अनुकूल होतें. महाकाव्याच्या रचनेला लागणारे गुण मोगऱ्यांच्या ठिकाणीं बीजरूपानें होते. परंतु त्यांच्या विकासाला व परिणतीला मोगऱ्यांची निसर्गदुर्बल प्रकृति आडवी आली, हा दुर्दैवाचा विलास होय !

चित्रकाराप्रमाणें कवीला आपलीं ध्येयें प्रथम कल्पनेंत रेखाटावीं लागतात. पुढें तसल्या अमूर्त ध्येयांना मूर्त स्वरूप द्यावयाचें असतें. चित्रकार हें काम रंगाच्या कुंचलीनें करितो; कवीला तें शब्दांच्या साहाय्यानें करावयाचें असतें. स्वभाषेवरील निरतिशय प्रेम, स्वदेशाच्या अभ्युदयाविषयीं आकांक्षा, गुणिजनाविषयीं अत्यादर, राष्ट्रिय विभूतींविषयीं पूज्यभाव, दीन व असहाय महिलाजनासंबंधानें दाक्षिण्य, सदुद्यमाविषयीं रति,शारदोपासनेबद्दल अनन्यभक्ति, वाममार्गाविषयीं तिरस्कार, विश्वबंधुत्वाचा उमाळा, इत्यादि सुंदर व विविध ध्येयें मोगऱ्यांच्या काव्यकलापांत आढळतात. विषय, शब्द व छंद यांची योग्य निवड, विषयाची मांडणी व वर्णन करण्याला लागणारें भाषाप्रभुत्व, व प्रबंधाला रंजकता आणणारे माधुर्य, प्रसाद व परिष्कृति हे गुण मोगऱ्यांच्या काव्यांत स्पष्टपणें दिसून येतात. जुन्या कल्पना देखील त्यांच्या काव्यांत नवीनत्व पावतात. त्यांची कविता विनयचातुर्यादिगुणसंपन्न कुलवधू आहे. तिच्यांत नाटकी आविर्भाव आणि छाकटेपणा बिलकुल नाहीं. ते अलौकिक समाधिसंपन्न कवि नव्हते हें वर सांगितलेंच आहे.आधुनिकलौकिक कवींत ते पुष्कळ वरच्या प्रतीचे आहेत.ते कोठें अंतर्मुख आहेत व कोठें बहिर्मुख आहेत,हें त्यांच्या काव्याच्या मार्मिक परिशीलनानेंच कळण्यासारखें आहे. गूढान्वेषणाकडे त्यांची मुळींच प्रवृत्ति नाहीं. इंग्रजी काव्यसमुद्रांत मोगऱ्यांनीं अवगाहन केलें होतें, तरी मराठी काव्याला त्यांनीं इंग्रजी तऱ्हेनें नटविलें नाहीं, आणि थाटविलें तर नाहींच नाहीं. त्यांची कविता सहेतुक असते. तिच्यापासून कांहीं तरी बोध घेण्यासारखा असतो. त्यांचीं परिहासात्मक काव्यें रत लोकांत सदभिरुचि उत्पन्न करण्याकरितां त्यांनीं रचिलीं असें दिसतें.

काव्याच्या अंतर्बाह्य रचनेसंबंधानें रा. मोगरे यांनीं अर्वाचीन पूर्व-कवींचें पूर्णपणें अनुकरण केलें आहे. पारखी, लेंभे, आठल्ये, लोंढे, विद्याधरपंत भिडे, टिळक, केशवसुत इत्यादि कवि मोगरे यांचे बरेचसे समकालीन होत. यांपैकीं पहिल्या पांचांच्या कृतीवर पुराण काव्यांचा छाप आहे. शेवटच्या दोघांच्या काव्यांवर इंग्रजी काव्यांची बरीच छाया पसरली असून विषयांतही विविधता अधिक आहे. टिळक व केशवसुत यांची रचना विशेषेंकरून पदात्मक आहे. या दृष्टीनें पाहतां अधुनिकांत दोन वर्ग स्पष्टपणें दिसून येतात-एक मोगरे-प्रभृतींचा व दुसरा टिळक प्रभृतींचा. पदांच्या रचनेसंबंधानें नियमबद्धता नसल्यामुळें तशा रचनेला स्वैरपणा आला आहे. तो वाचकांना फार नडतो. तसेंच पदांच्या रचनेंत स्वरमाधुर्य अर्थावर आपलें वर्चस्व स्थापित करूं पाहतें, हें ठीक नव्हे. मोगरे यांचा इंग्रेजीं काव्याचा व्यासंग मोठा होता. तथापि त्याचा त्यांनीं मराठी काव्यें रचण्याच्या कामीं उपयोग केला नाहीं. आलीकडे आंग्लवाङ्मयांत विशेष प्रतिष्ठा पावलेल्या वीणागीतांचा पुरस्कार टिळक वगैरेनीं मराठींत केला आहे. असलीं गीतें त्यांतील विषयानुरोधानें साहजिकच लहान लहान असतात. आधुनिक कवींचा असल्या लघुकाव्यांवरच विशेष भर असल्यामुळें त्यांच्या हातून मोठालीं काव्यें निर्माण होत नाहींत. मोगऱ्यांच्या हातून मोठें काव्य निर्माण न होण्याचें कारण वर सांगितलेंच आहे.

कै० हरिभाऊ आपटे व रा. अच्युतराव साठे यांचा मोगरेकवींशीं प्रत्यक्ष परिचय किंबहुना स्नेह होता. आम्हीं मोगरे चित्रांत पाहिले आहेत, व मोगऱ्यांत त्यांचें चित्र पाहिलें आहे ! मोगऱ्यांच्या कन्येचें दान करण्याचा हक्क वरील गृहस्थांस पोंचतो; आम्हांला पोंचत नाहीं. आम्हीं मोगऱ्यांच्या कन्येच्या[1] केवळ कुलाची, शीलाची, रूपाची व गुणांची शिफारस करून तिची रसिकाशीं गांठ घालून दिली आहे. या युवयुतींचा परिचय प्रेमांत परिणत होऊन परिणयांत स्थिर होवो ! या दंपतीचा परस्परानुराग वृद्धिंगत होऊन त्यांचा वियोग कधींही न होवो ! ही आमची प्रेमपूर्ण भावना कै० मोगरे यांच्या आत्म्याला चिरंतन शांति देवो !

पुणें.
जून, इ. स. १९२० } **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.**

---

१. मोगऱ्यांच्या काव्यकलापांत.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | काव्याची | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| १ | १ | | यांनीं | जयांनीं. |
| ५ | १६ | | रागा | राग |
| ९ | १७ | | देशेसवा | देशसेवा |
| ,, | ४ | | मिषग्वरा | भिषग्वरा |
| १४ | ५ | | तुजचा | तुमचा |
| १५ | २ | | गर्वोधत्य | गर्वौद्धत्य |
| १६ | ५ | | आठवुनीयां | आटवुनीयां |
| १८ | ३ | | शिविरांत | शिबिरांत |
| ,, | ९ | | कुद्ध | क्रुद्ध |
| २५ | ५ | | मद्भुज | मद्भूज |
| ३२ | ८ | | ढंक | ढंग |
| ३६ | १६ | | दिसले | दिसेल |
| ४२ | २ | | निर्भत्सर | निर्मत्सर |
| ५३ | ७ | | पृष्टीवरी | पृष्ठावरी |
| ५८ | २ | | आर्चा | अर्चा |
| ६२ | ६ | | तास | तीस |
| ,, | १७ | | कीर्तिच | कीर्तिच ती |
| ,, | ,, | | भासवी | भासवो |
| ६६ | १५ | | स्वप्रजानयें | स्वप्रजा नयें |

३१ पृ. आरंभींची टीप. माधवबागेंतळी सभा १८८४ सालीं झाली.

# मोगऱ्याचीं फुलें.

## गुच्छ ५.

### खरी राजनिष्ठा.

स्वदेशाभिमानें यांनीं स्वकाया
असे अर्पिली देशकल्याण व्हाया,
अशा सर्व देशाभिमानी जनांस
विनंती करी हा तयांचाच दास.
महाराज्ञिचा पुत्र एद्वर्द नामा
निघाला असे यावया आर्यधामा;
तरी व्हा पुढें ! दाखवा राजनिष्ठा !
पुढें प्राप्त होणें न हा लाभ मोटा. २
दयेनें नृपें वागवावें जनांला
तशी वागवी ती सती आपणांला;
असें जाणुनी राजनिष्ठाप्रभावें
महाराज्ञिला इष्ट तें तें करावें. ३
उदासीनता सोडुनी अंतरींची
करा सिद्धता राजपुत्रादराची !
नका खिन्न होऊं गतैश्वर्यशोकें !
धरा धैर्य सोडोनि खेदा विवेकें ! ४

नका दर्शवूं राजनिष्ठा धनानें,
परी दर्शवा काय–वाचा–मनानें !
धनाची नसे वाण त्या राजपुत्रा,
तया पाहिजे राजनिष्ठा पवित्रा. ५
नका मोठमोठ्या किताबां भुलोनी
करूं सर्वथा स्वीय वित्तांशहानि !
असे वित्त तों मान आहे किताबा,
धनावीण त्या कोण देणार शोभा ? ६
तुम्ही ह्या प्रसंगीं न वित्तव्ययातें
करावें; नसे शक्य तेंही तुम्हांतें.
परी वर्तणें वर्तमानानुसारें—
असें सांगती जाणते लोक सारे. ७
करें पीडिलों, जाहलों दीन भारी,
तरी नेणुनी हें वरिष्ठाधिकारी
शिरीं आमुच्या धोंड देती करांची—
करा सूचना राजपुत्रास ह्याची ! ८
असे आपदा आज जी जी तुम्हांला
कथा सर्व ती राजपुत्रोत्तमाला !
जरी ऐकुनी ती दया त्यास आली
तरी जाणिजे दुर्दशा नष्ट झाली ! ९

इं. प्र. १८।१०।७५ एक विद्यार्थी, एल्फिन्स्टन हायस्कूल.

## भिक्षुक.

भिक्षावृत्तिशिवाय ज्यास दुसरा उद्योगची नावडे,
संध्यावंदन एकदांच[1] सगळ्या वर्षांत ज्यांना घडे,
होती पाठ न घोकितां निशिदिनीं चोवीस नांवें जयां,
ऐसे संप्रति पाहती जन दशग्रंथी जगीं व्हावया. १

लोकीं घेतात वैयाकरण म्हणवुनी नेणतां वर्णभेदा,
द्वैताद्वैत स्वरूपा नुमजुनि करिती व्यर्थ वेदान्तवादा,
नेणोनीही स्वभाषा सतत मिरविती संस्कृताची घमेंडी,
ऐशा शास्त्रीबुवांच्या भटकत फिरती आज सर्वत्र झुंडी. २

कर्त्याला न करीच कार्य, करितो कर्ताच कार्याप्रती—
ह्या सिद्धान्तमताविरुद्धहि जगीं होतात आतां कृती;
हा दृष्टान्त पहाः पुरा शुक रची ज्या पापसंहारका
तें श्रीभागवत स्वयें निपजवी लक्षानुलक्षां शुकां. ३

१ श्रावणीच्या दिवशी.

## काकांची कानउघाडणी.

[ एक स्वप्न. ]

निजलों होतों रात्रीं, निद्राही लागली मला घोर
इतक्यामध्यें स्वप्नीं एक चमत्कार पाहिला थोर. १
ज्यांनीं ज्यांनीं केवळ हांजी हांजी करून मजपाशीं
वारंवार धनाच्या होमविल्या माझिया करें राशी. २
ते सर्व मित्र माझे येउनि मजला करोनियां प्रणती
'काका'! 'काका'! ऐशा हांका मारूनियां मला म्हणती. ३
" तुमचें दर्शन होतां वाटे आनंदपर्वणी आली
" म्हणुनी आज इथें ही सारी एकत्र मंडळी झाली. ४
" नाहींच भाग्यशाली आज तुम्हांसारखा दुजा कोठें
" काका ! इंद्रापेक्षां तुमचें ऐश्वर्य वाटतें मोठें. ५
" वक्तृत्वाचें तुमच्या आम्ही सामर्थ्य काय बोलावें !
" काका ! शुकवाणीशीं तुमचें प्रत्येक वाक्य तोलावें ! ६
" नम्र स्वभाव तुमचा किति हें सांगावया नको लोकां
" ज्याला रुचेल त्यानें द्याव्या त्याला हव्या तशा झोंका. ७
" ऐकुनि जो वाटावी कर्णालाही खरोखरी लाज
" औदार्याचा तुमच्या बाजाही वाजतो असा आज. ८

" उपकार ह्या जगांवर झाले जे थोर थोर तुमचे ते
" गातां गातां कविची मति डुलक्या गुंग होउनी देते. ९
" स्वयशें तुम्ही खरोखर काका ! तो धर्मराज लाजविला
" हा पांचजन्य म्हणुनी आम्ही सानंद आज वाजविला. १०
" वाजो असाच तुमच्या कीर्तीचा हा घरोघरीं डंका—
" इतकें म्हणूनि देतों हार तुरे घ्या धरूं नका शंका. ११
" वाढो अशीच तुमची कीर्ति सदा!" हें म्हणूनि ते बसती
तों होय देववाणी कीं: "काका! लोक आपणा हंसती. १२
" जमले फसवाया हे पुतण्यांचें सोंग घेउनी काका !
" फसलां, फसाल याहुनि! चित्तभ्रम जाहला तुम्हां हा कां? १३
" हे स्वार्थसाधु सारे लोक सदा गोड गोड बोलून
" घेतील साल तुमच्या अंगाचीही समग्र सोलून !" १४
जागा होउनि वदतों तों तिकडे एकटाच मी आहें !
सांगा ! समजुनि सांगा ! स्वप्न कसें वाटतें तुम्हांला हें. १५
मित्र म्हणूनि तुम्हां हें स्वप्न मला सांगणें पडे भाग;
वाटो खेद सुखानें, ह्याचा आणूं नका परी राग. १६
इतकें परी करा कीं कोणापाशीं न गुह्य बोला हें;
कीं फजितीच खरोखर माझी तुमचीहि ह्यामधें आहे. १७

## तापसीबाई.

[ ३८ वर्षांमागें **तापासीबाई** नांवानें प्रसिद्ध असलेली एक विदुषी मुंबईस आली होती, तिला उद्देशून कवीनें पुढील कविता लिहिल्या.

मैत्रेयीच जिला कितीक म्हणती, गार्गी किती मानिती,
भासे मंडणपंडितप्रियतमा प्रत्यक्ष कोणाप्रती;
ती तूं दिव्यतपःसरोविहरिणी हंसीच होशी जसी,
बाई ! लोक समस्त यास्तव तुला हे बोलती तापसी ! १

कल्याणीं स्वस्वसांच्या झटुनि तनु जरी आपली कष्टवीती
होती स्पर्धा कराया उचित मग तुझी याज्ञवल्क्यांगना ती;
झाला गार्गीस वाद प्रिय बहु, तुजला वीट आहे तयाचा;
कापट्यें रिक्त केला उदधिच सगळा शारदेच्या यशाचा ! २

तुझें अत्युक्तीनें स्तवन न करीं मी, परि खरें
असे तें मी सांगें, जन मज म्हणो वाइट बरें;
अविद्येच्या दासी सकल बनल्या आर्यवनिता,
तयांच्या मुक्त्यर्थ प्रगटलिस तूं ब्रह्मदुहिता ! ३

ह्या संसाररथास दोन असती चक्रेंच जीं मानिलीं
तीं नारी नर होत, हें विदितची आहे तुला माउली !
एक ज्ञानबलें सशक्त, न दुजा ती प्राप्त होई स्थिति,
जातां यास्तव तीं यशःपुरपथें मध्येंच खोळंबती. ४

तूतें बाई ! करिशिल तरी साध्य हें कार्य आहे,
ह्यासाठीं तूं खचित इतकें श्रेय घेऊन जा हें !
नाना यत्नां करुनि शिणलों, कार्य कांहीं न झालें,
कीं तें आहे तुजवरि जगन्नायकें सोंपवीलें ! ५
अनादर तुझा न त्या करितिल त्वदीय स्वसा,
असा भरंवसा असे खचित आमच्या मानसा;
म्हणोनि करितों तुला विनति कीं करोनी श्रमा
हरी स्वभगिनीचिया सकलही अविद्यातमा. ६
विद्याभ्यास करूं नये कलियुगीं योषिज्जनीं सर्वथा—
ऐसें संप्रति शास्त्रबाह्य मत जें उत्पन्न झालें वृथा,
तेणें ज्ञानविहीन आर्यभगिनी होवोनि गेल्यामुळें
सत्यासत्यविचार दूरचि तयांपासूनि सारा पळे. ७
सांगूं तुला अधिक काय ? समस्त आहे
ठावें तुला; करुनि दूर विचार पाहें !
अस्मन्मनोरथ सुपूर्ण करोनि माते !
लावीं कवीस निज सद्यश गावयातें ! ८

## अण्णा किर्लोसकर.

[ पुढील श्लोकबद्ध पत्र कवीनें रा. रा. बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णा किर्लोसकर यांस १९।१२।१८८५ रोजीं पाठविलें. ]

नेलीं लोकमनें हरोनि तुमच्या संगीतशाकुंतलें,
द्याया यास्तव पारितोषिक तुम्हां नाहीं दुजें राहिलें;
हें ठावें असतां तुम्हांस, मग ह्या संगीतसौभद्रका
घेवोनी बळवंतराव ! इकडे आलां तुम्ही आज कां? १
या, या, संगीतरंगें रसिकजनमनोरंगभू रंगवा ही !
शृंगारायास हीला क्षम इतर तुम्हावीण कोणीच नाहीं.
नाहीं युष्मत्कृतीला बघुनि निजशिरा हालवीलें जयानें
त्या मूढातें म्हणे जो रसिक, रसिकता लाजवीली तयानें. २

करीं अत्युक्तीनें कथन तुमचे मी गुण, अशा
अवस्त्वारोपातें मजवरि करायास शतशा
जरी आले, त्यांतें न गणुनि तरी मी वदतसें—
तुम्हां झाले अन्या वश रसिक होतील न तसे. ३
रसज्ञ असुनी, रसप्रिय तुम्ही स्वभावें असां,
उठे रसिकहृत्पटीं तुमचिया कृतीचा ठसा;
म्हणून नसतां स्वयें रसिक तूमची योग्यता
वरूं बघति त्यांकडे रसिकता श्रमे पाहता. ४

जातां विक्रम मुंज भोज विलया आधार येथें नसे
ऐसें पाहुनि गौरकायसुरनीं जी नाट्यविद्या वसे,
तीला आर्यमहींत आणुनि पुन्हा विद्वज्जनांच्या मनां
जो आनंद तुम्हीं दिला न करवे त्याची मला कल्पना ! ५

अभिनयकला वाटे कोणा अतिप्रिय तूमची;
कवण म्हणतो युष्मद्गानीं अपूर्व असे रुचि;
परि रसिकता विद्वानांच्या तुम्हीं दिवली करीं
मुदित बहु ही मच्चित्तातें कृती तुमची करी. ६

होवो नष्ट न आर्यनाटककला संगीतविद्या तसी,
इच्छा वागवितां निरंतर तुम्ही ही आपल्या मानसीं;
आहे योग्यचि हें; परंतु करितों जी एक विज्ञापना
तीचा हो उपयोग हीच तुमच्यापाशीं असे याचना. ७

ज्यांनीं दिल्लीश्वराचे हतबल करुनी संगरीं शूर वीर
झेंडे अस्मद्यशाचे उभवुनि सगळें झांकिलें सिंधुतीर,
त्या श्रीबाजी शिवाजीप्रभृति शुभयशःसागरांचीं चरित्रें
आणोनी रंगभूमीवर मुदित करा एकदा लोकनेत्रें ८

सहज घडुन येणें देशसेवा तुम्हांला,
वसतिल जनचित्तीं पूर्वजांच्याहि लीला,
जड जन इतिहास ग्रंथ घेतील हातीं,
रसिकहि नवलाभें तोषतील स्वचित्तीं. ९

जरी त्या दावाया उचित असती उत्तम पथा
तरी आतां लोकां रुचति नच पौराणिक कथा;
प्रयोगांला त्यांच्या बघुनि सुख पावोत नयनें,
परी बोधाया त्या शकतिल न आतां जनमनें. १०

आणा तो रंगभुमीवर यवनवनज्वालमाळी शिवाजी !
येऊं द्या तोहि बाजी निशिदिनिं विजयश्री जया होय राजी !
पाहूं द्या एकदां ते भट अटक नदी लंघितां राघवाचे !
रंगीं तो कां न नाचो टिपुस रगडितां जो रणीं फार नाचे ! ११

केली असे विनति मान्य करा नका वा,
म्यां काय आग्रह तुम्हांस वृथा करावा ?
आली असेल करुणा जरि ह्या महीची,
सेवा तुम्ही तरि करालचि सत्य हीची ! १२

## पुस्तकावर अभिप्राय.

[ कै. नारायण विठ्ठल वैद्य पुरंदरे यांनीं इ. स. १८८४ सालीं " उत्तर कोंकणांतील प्राचीन शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मण यांची माहिती " हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या ग्रंथासंबंधानें रा. गंगाधरपंतांनीं पुढील कविताबद्ध अभिप्राय ग्रंथकारास पाठविला. ]

लोकीं पुरन्दरे हें साजे ज्याच्या कुलास उपनाम,
जो पुत्र विठ्ठलाचा नारायणराव सद्गुणग्राम; १
जोडुनि करद्वयातें करुनी भावें पुनः पुनः प्रणति
करितों नम्रत्वें मीं त्या बुधवर्या भिषग्वरा विनतिः २
" उत्तरकोंकणसंस्थित बिंबाश्रितभूसुरेतिहास कृती
तुमची होय खरोखर फाराचि मन्मानसास रंजविती. ३
बोलावें काय म्यां हो ! खचिताचि तुमच्या मोल नाहीं श्रमाला;
द्रव्याचाही असावा अपरिमितचि ह्या कारणीं खर्च झाला.
आश्चर्यें ह्या कृतीला निरखुनि तुमच्या हालवी जो न मान
भूलोकीं ह्या असावा अरसिक बहुधा तोच त्याच्या समान ! ४
वाटे कृतिवर तुमच्या द्यावा म्यां आपला अभिप्राय,
परि मजमध्यें नकळे आहे सामर्थ्य एवढें काय ? ५
पाहुनि तथापि तुमची कृति वाटे मन्मनास जें कांहीं
कळवाया स्पष्ट तुम्हां तें न सरो लेखणी पुढें कां ही ? ६

म्हणतां अनेक विघ्नें करितां हें कार्य आडवीं आलीं;
सांगा निर्विघ्न परी सत्कार्यें सिद्ध कोणतीं झालीं ? ७
विघ्नें येती तों तों कार्यांचें मोलही चढे सहजीं;
निर्विघ्न कार्य करणें हा वाटे शुद्ध पोरखेळ मज. ८
होणार कार्य झालें, विघ्नें आलीं तशीं लया गेलीं,
कां पाहिजे तयांची चिंता आतां तुम्हीं वृथा केली ? ९
बुध हो कींव तुम्हांला आली ज्या आपल्या समाजाची,
आहे शुद्ध मनानें सेवा संपादिली तुम्हीं त्याची. १०
ते आठवोत अथवा तुमचे उपकार नाठवोत मनीं;
कर्तव्यकर्म करुनी झालां आहां तुम्हीं कृतार्थ जनीं. ११
थट्टा करोत तुमची कोणी तुमची करोत वा निंदा;
कोणी म्हणोत करितां स्वहितासाठींच हा तुम्ही धंदा; १२
मत्सर करोत कोणी तुमचा तुमच्या विलोकुनी कृतिला;
कोणी म्हणोत हा भ्रम माझ्या तुमच्याहि जाहला मतिला; १३
कोणी करोत तुमचा तुमच्या कृतिचाहि आज उपहास;
कोणी झटोत तुमचे यत्नहि निष्फळ सुखें करायास. १४
ऐका परंतु तुमच्या कृत्या जे आज दोष देतात,
वंशज त्यांचेच पुढें चुकले म्हणतील आमचे तात ! १५
समजूं नका मनीं कीं आजचि सुविचारसूर्य मावळला—
आहे यद्यपि त्यावर सम्प्रति मदमत्सराभ्रपट वळला. १६

मदमत्सर स्वभावें शमतिल ते काळमानयोगानें;
निंदा निवेल तुमची स्वस्थानीं आपल्याच भोगानें. १७
जे निंदिती तुम्हां ते वंदाया निजसुखेंचि सजतील;
किंबहुना ते तुमच्या दोषांसहि गुण गणोनि भजतील ! १८
सारांश, दोष कांहीं तुमच्या ग्रंथामधें जरी असले
तरि तद्गुणसंगानें तेहि गुणप्राय होउनी बसले. १९
केला तुम्हीं खरोखर लोकभ्रम आपल्या श्रमें नष्ट;
राहील राहिला तरि होउनि तो नामशेषाचि स्पष्ट. २०
आज उद्यां वा काळें तुमचे उद्देश सिद्ध होतील,
माध्यन्दिनचि न इतरहि युष्मच्छ्रमलाभ विप्र घेतील. २१
शमुनी कालवशें हें सर्वहि लोकापवाद—वावटळ
जनमतवातावरणीं अविचाराचा नुरेल लेश मळ. २२
सदसद्विचारसूर्य प्रगटुनियां लोकमानसाकाशीं
अज्ञानध्वान्ताच्या विलया नेईल सर्वथा राशी. २३
अन्योन्य वैर सोडुनि भेटाया आपआपल्या भावां
गौड द्राविड सारे प्रेमानें मारतील हो धांवा. २४
आनंदाश्रुजलानें अन्योन्यांच्या तनूंस न्हाणून
म्हणतिल—चुकलों मुकलों होतों निज बांधवां न जाणून ! २५
जे ह्या सत्कृत्याचें होतील श्रेय ध्यावया उचित
गणना होइल तुमची त्याच महाभागमंडळीं खचित ! २६

कां पाहिजेत दुसरे जेव्हां जेव्हां प्रसङ्ग येतील
युष्मद्यशास तेव्हां निस्पृह इतिहासकार गातील. २७
सांगूं अधिक कशाला अपवादांचे कितीहि थर वरती
पडले तथापि तुमची कीर्ति न झांकील एक लवभर ती. २८
ग्रंथ विलोकुनि तुजचा लिहिलें जें वाटलें खरें मातें
योग्यायोग्य परीक्षण करुनी मानोत लेख हा ज्ञाते. २९
लेखांत दोष कांहीं घडले असतील द्या क्षमा त्यांची
करुनी, लोभ असों द्या सन्तत, मी हेंच शेवटीं याचीं. ३०

## वाग्युद्ध.

### आर्या.

होमरकवीच्या ‘ इलियड ’ नामक काव्यांतील एक दोन प्रसंगांचें पुढील मराठी रूपांतर आहे. हर्यक्ष=Achilles. आत्रेय राजा=Agamemnon.

[ १९३–२२४ ]

हें ऐकतांच कोपें होउनि संतत राजयास तदा
हर्यक्ष वदे: ‘ शस्त्रीकृतगर्वोंधत्य भूमि-पापसदा ! १
नीचा ! अससी निरट स्वार्थेच्छेचाच नीच तूं दास !
लाजविसी अझुनि किती ह्या कपटें तूं स्वराजवंशास ? २
आज्ञेस मान तुझिया देउनियां कोणता खरा सौर
घाला घालिल अरिवरि किंवा उपशील सांग तरवार ? ३
होतें कारण मजला तुजसाठीं काय रे लढायास ?
दूरस्थ सिंहलस्थीं ह्या मज नाहीं दिला कधीं त्रास. ४
मरुभूमिका न त्याच्या स्वारांनीं वेढिली कधीं माझी;
होते चरत सुखानें माझेही काननांत रणवाजी. ५
जी वीर्यवान् भटांची झाली आहे अखंड जनयित्री;
फळती फुलती संतत विपुलत्वें तरुलता जिच्या क्षेत्रीं; ६
दुर्गप्राय सभोंतीं पर्वत जीच्या, महाब्धिही रक्षी
वेढुनि जियेस, त्या मम भूस कवण वक्रदृष्टिनें लक्षी ? ७

आम्ही न सार्वलौकिक वैरप्रतिकृति करावया आलों;
एकाच्या कैवारा घेउनि युद्धीं स्वयेंच रत झालों. ८
नसतें कार्य कृतघ्ना तूझें तूझ्या सहोदराचेंही,
आलीं असती कां रे मग सैन्यें सर्व सिंहलातें हीं ? ९
कष्टतसों तव कार्या आठवुनीयां स्वरक्तही, त्याचें
दुःखापमान हेंच श्रेय तुझ्याकडुनि काय घ्यायाचें ? १०
नाना संकटसमयीं गाजवितां स्वीय बाहुवीर्य मिळे
जें फळ मज, तें घ्याया हिसकुनि तूं पाहतोस काय बळें? ११
भाग तरी तो माझा तुळितां भागासवें तुझ्या दुष्टा !
आहे लघुतर फारच मत्कृतिहुनि तव कृती जशा नष्टा! १२
भांडुनि संकटसमयीं न्हाणावा म्यां स्वदेह घामानें,
उत्तम विभाग घेउनि जावें त्वां मात्र कोरड्या मानें ! १३
माझ्या वांट्यास कधीं उरला तर अल्पमोल ये भाग;
किंवा शुष्क स्तोत्रीं युद्धव्रण साहणें पडे भाग. १४
ऐक मदांध नृपा ! परि यावरि नाहीं त्वदीय सेवक हा !
घेवोनियां स्वसेना मीं मरुदेशास चाललोंच पहा ! १५
लंकाप्रदेश सोडुनि जातां हर्यक्ष शत्रुशशिराहु
कैसा यशोधना हा मिळवी आत्रेय तें तरी पाहूं ! १६

[ २२५–२५० ]

ऐकुनि हें राव वदे: 'वीरवरा ! ऊठ रे त्वरें जा जा !
साह्य नको तव आम्हां; न गणी धमकीस हा तुझ्या राजा ! १
कां पाहिजेत असल्या कार्यी योद्धे तरी लढायाला ?
राजाधिकार रक्षिल शंभु; असे सर्व काळजी त्याला. २
ज्या रक्षिती निजांगें निर्जर, भूपावळींत त्या आहे
कोण असा जो राजद्रोहातें क्रोध टाकुनी साहे ? ३
कलहप्रिय वादप्रिय असती, तुज हाच सर्वथा ध्यास;
तुजला न वीररौद्रेतर रस दे कोणताच उल्हास. ४
अंगीं असे तुझ्या बळ, परि आहे देणगी प्रभूची ती;
गर्विष्ठा तुज दिधलें वीर्य प्रभुनेंच जाण हें चित्तीं ! ५
हाकारुनी स्वनौका जा जा लवकर ! नको बसूं आतां !
वाटे तशी स्वराज्यीं मिरवीं जाऊनि आपली सत्ता ! ६
परवा नसे तुझी मज; तें त्वन्मित्रत्व अल्प दिवसांचें,
निष्कारण वैरहि हें, मानीं मी एकसारखें साचें. ७
जा भिववीं तूं त्या तव वल्मीकोद्भव भटां अशा भीनें !
इकडे भिववावें म्यां, भ्यावें त्वां राजया जसें दीनें ! ८
त्या सुंदरीस सांगे परत करायास देवराय, तरी
माझ्या तरी [1] सुखानें तिजला नेऊन ठेवितील घरीं. ९

---

१ नौका.

धृष्टा राजकुमारा ! सिद्ध परी सिद्ध हो तुझी घाया
जाया युद्धजिता मज ! कोपें जरि कोपलास तूं वायां ! १०
देशील दे सुखानें ! न तरी तुझिया शिरोनि शिविरांत,
ती त्वत्प्रिया मृगाक्षी राधा आणीन मी धरुनि हात. ११
तेव्हां मच्छक्तीचा महिमा येईल रे तुला कळुनी;
म्हणशिल जळो स्वराजद्रोहोत्पादक घटी हि हळहळुनी. १२
तेव्हांच आपल्या ह्या कळुनी येईल सैनिकांनाही
कीं हटकिता सुरांविण दुसऱ्या ह्या लोकनायका नाहीं.' १३

[ २५१–२९६ ]

केला ह्या नृपवचनीं हर्यक्ष क्रुद्ध खिन्नही फार;
शोकभरें उर भरला, सुटला हृदयास कंप अनिवार. १
शिरती विचार येउनि एकामागून एक भिन्न मनीं;
धडके क्रोधानल तो, प्रगटे सुविचारनीर तच्छमनीं. २
कोप म्हणे: ऊठ झणीं ! घेउनि तें जीवितघ्न खड्ग करीं,
त्या मदमत्त नृपाचें वक्षःस्थळ तच्चमूसमक्ष चिरीं ! ३
सदसद्विचार सांगे: वैरप्रतिकारबुद्धि तूं न धरीं;
हो शांत शीघ्र बापा ! रागाच्या आवरोनियां लहरी. ४
ऐशा शंकावर्ती पडला तो; हात घातला ज्याला
तो दिव्यासिहि[1] होता कोशाबाहेर अर्धवट आला. ५

---

१ दिव्य असि=तरवार.

इतक्यामधें अकस्मात् व्योमपथें शीघ्र उतरुनी खालीं
हर्यक्षाच्या मागें भानुमती येउनी उभी ठेली. ६
त्या दोघांहि नृपां जी लक्षी सम निज कृपाकटाक्षांनीं
आखंडलप्रिया ती प्रेरी त्या देवतेस त्या स्थानीं. ७
तीच्या आगमनीं ती घोर तमीं होय वाहिनी वसती;
ती मात्र एकटया त्या हर्यक्षालाच जाहली दिसती. ८
हस्तस्पर्शें तीच्या विस्मित होवोनि पाहुनी मागें
दृग्तेजें तीस तिच्या जाणुनि बोलावयास तो लागे. ९
आली स्वर्ललना हे स्वर्गापासून भक्त रक्षाया;
आत्रेयें केलेला छळही माझा समग्र लक्षाया. १०
आहे असें तरी मग देवी ती ज्या महापराधातें
पाहे स्वयें, तयाचा घेतां पाहो न सूड कां मातें ? ११
सूर्यसुता त्यास म्हणे: वीरा हो शांत, कोप हा टाक !
शमवाया क्रोध तुझा आलें मी आज सोडुनी नाक. १२
वीरवरा हर्यक्षा ! देवांवर ठेविजे तुवां भार
तव चित्तावर मिरवो संतत सदसद्विचार अधिकार. १३
ती सर्वलोकपूज्या ऐक तुला सांगते जगन्माता—
कीं त्या जशी नृपाची आहे देवां तशीच तव चिंता. १४
हो विद्ध त्या नृपाचें हृदय तुझ्या परम तीक्ष्ण वाग्बाणीं;
उपसाया शस्त्र परी सरसावो ना कधीं तुझा पाणी. १५

निर्भर्त्सना तुझी ही परिणामीं त्या फळेल रायास;
ह्या माझ्या देवीच्या वचनीं तुजला नसो अविश्वास. १६

व्हावें साह्य तुवां त्या यास्तव घेउनि असंख्य धनराशी,
सख्य करायास पुन्हा राजा येईल तोच तुजपाशीं. १७

यास्तव आतां सोडुनि वैरप्रतिकारवासना प्राज्ञा !
त्वां क्रोध आवरावा देवांची ही असे तुला आज्ञा. १८

हर्यक्ष वदे: देवी सादर केली त्वदुक्ति म्यां श्रवण;
जें सांगसी असे तें सर्व खरें. अनृत त्या म्हणे कवण? १९

आहे जरी अनावर आंवरितों मी स्वकीय कोप तरी
तव वचनास्तव; कीं जो मानी देवांस तोच सौख्य वरी. २०

ऐसें वदोनि देउनि भक्तिपुर:सर मुखाकडे लक्ष
त्या देवीच्या, घाली कोशीं निज दिव्य खड्ग हर्यक्ष. २१

तत्काळ देवताही ती झाली चालती नभोमार्गें;
जाउनि देवसमाजीं झालेलें सर्व वृत्तही सांगे. २२

इतकें होय तथापि न उपशम त्या लेशमात्रही घडला
होता हर्यक्षाच्या हृदयीं जो कोपवन्हि धडधडला. २३

क्षोभ दुणावे त्याचा न शके हर्यक्ष वीर तत्प्रशमीं;
क्रोधाग्नि तो नृपावर वाग्व्याजें म्हणुनि शेवटास वमी. २४

[ २५—२६ ]

हा क्रूरा दिससी तूं दर्पें उच्छिष्टपुष्ट कुक्कुरसा !
निज वर्तनें परी त्वां लाजविला को[illegible]भीरु ससा ! १
सांग स्वयें कधीं त्वां अरिवर जाऊनि घातला छापा ?
शिरला होतास कधीं धैर्यें तूं घोर संगरीं क्ष्मापा ? २
जातों युद्ध कराया आम्ही, तूं कुतुक पाहसी दुरुनी !
किंवा म्हणशी वीरां—जा स्वर्गी घोर संगरा करूनी. ३
जिंकुनि रिपूंस तुजला द्रव्य हरोनी न आणवे त्यांचें,
सोपें काम रुचे तुज म्हणुनी हें स्वप्रजा लुटायाचें ! ४
हे मत्ता ! हे नीचा ! स्वजनवनच्छेदका कुठारा हे !
प्रभुकोपेंच तुझी ही सौरचमू दास होउनी राहे ! ५
काय करूं? दास्यप्रिय सौरीं स्वातंत्र्यभक्ति ह्या नुरली;
न तरी आजचि असतीं शंभर वर्षें तुझीं पुरीं भरलीं ! ६
सर्व असो तें आतां; माझा जो हा पवित्र दंड असे,
पानें फुलें जयाला यायाचा राहिलाच काळ नसे; ७
पिंडायससरुमंडित चिन्हच आखंडलप्रसादाचें
म्हणतात भक्त ज्याला त्या सर्वन्यायधर्मबलदाचें; ८
त्या ह्या दंडावरती ठेवुनियां हात लंघवेना जी
आम्हां नृपां, अशी मी घोर शपथ ऐक वाहतों आजी ! ९

१. तिख्याची मूठ जिला आहे तें.

दा. क्र. २१

वृक्षापासुनि सुटला दंड जसा हा पुन्हा न त्यास जडे,
तैसा तुजपासुनि मी; यावरि माझें तुझें न सख्य घडे ! १०
समरांगणांत वाहत असतां पूर स्ववीररुधिराचे,
बाहूनि पुनःपुन्हा मज शिणतिल हे व्यर्थ भार सौरांचे! ११
जेव्हां विजयावेशें रुधिरानें रंगवून रणधरणी
पर्वत रचील तिकडे प्रेतांचे चित्रसेन वीरमणी; १२
अक्षम संरक्षाया तेव्हां होऊनि ह्या स्वपक्षास
रडशिल म्हणशिल फसलों मूर्खपणें मजसि देउनी त्रास. १३
अंतीं पश्चात्तापें तळमळतां तूंच जाणशील मनीं,
कीं जोडिला स्वदोषें त्वां रिपु जो प्रबल सर्व सौरजनीं. १४

## आपल्या आईपाशीं हर्यक्षाचें स्वापमानकथन.

### आर्या.

पाताळीं निज जनकाजवळी निश्चित बैसली होती,
तेथें रंभा देवी निजसुतशोकोक्ति आयके हो ती. १
उठली सवेग तेथुनि भेदुनियां सागरोदरा, जिकडे
होता स्वपुत्र बसला आली ती स्वर्गसुंदरी तिकडे. २
निर्जनसिंधुतटस्थित शोकार्त स्वात्मजास पाहून
वदती झाली देवी प्रेमभरें ती तयास बाहून: ३
रंभा म्हणे:—सुता कां रडशी ? आलें तुझ्यावरी काय
संकट मला कळों दे ! दुःख तुझें ही न कां हरो माय ? ४
येरु वदे—'माये ! कां जाणुनि मद्दुःख तूं मला पुससी ?
सांगूं कशास तें तुज जाणाया जें समर्थ तूं असती ? ५
तगरेश्वरा अशोका जिंकुनि मार्गांत आमच्या सेना
आल्या हिरोनि घेउनि जेंव्हां मणि हेम दासदासींना; ६
आपापल्या श्रमांच्या मानानें तेधवां यथायोग्य
आम्ही सर्व भटांनीं वांटुनि त्या वस्तु घेतल्या भोग्य. ७
तेंव्हां पूर्णसुधाकरवदना कृष्णा अमोघ रूपातें
होतां बहुमत दिधली आम्ही त्या आमच्या चमूपातें. ८

माये ! परंतु कश्यप घेऊनि माणि कनक सोडवायाला
बंधांतुनि रायाच्या मुक्त करायास आगली बाळा, ९
रविदत्त दंड हातीं पर्णकिरीटहि शिरीं वसे ज्याच्या
विप्र असा तो येईं अति नम्रत्वें समोर राजाच्या. १०
आशीर्वचन समस्तां देउनि दोघां सहोदरां राया
लक्षुनि कश्यप बोले: स्वसुता द्या हो अनाथ विप्रा या ! ११
ऐकुनि ह्या द्विजवचना सौर सकल एकदांच ते म्हणती—
विप्रास बोळवा तत्कन्या अर्पुनि करोनियां प्रणती ! १२
रुचली परंतु राया आत्रेया ही न आमची वाणी;
दुर्वाक्शरें द्विजा तो तद्वन नाकारुनी मदें हाणी. १३
त्या सूर्यप्रियभजका दुःसह हा स्वापमान बहु झाला;
घ्याया सूड तयानें प्रार्थुनि म्हणुनी प्रसन्न रवि केला. १४
भक्ताच्या कैवारें सौरचमूचा करावया ग्रास,
प्रेरी प्रकुप्त होउनि भास्कर अत्यंत घोर रोगास. १५
तत्काळ सौर सैन्यीं रोगांनीं त्या करोनि संचार
लोळविले वीरांचे, करुनि गतप्राण, भूतलीं मार. १६
सैन्यविनाश विलोकुनी भूतभविष्यज्ञ विप्र चाणाक्ष
उठुनि वदे: ‘छळिला द्विज हें त्याचें घे उटें सहस्राक्ष.’ १७
आम्हां समस्त वीरां मानवली उक्ति ही द्विजाची त्या;
वदलों सम्यगुपायें[1] शीघ्र करा सुप्रसन्न आदित्या. १८

१ सम्यक् उपायें = योग्य उपायांनीं.

अंगारक नृप तो ह्या योगानें क्रुद्ध होय फार परी;
मज बोलुनीच केवळ भिववि न, जें बोलिला तसेंच करी. १९
बापाकडे तिच्या त्या तरुणी कृष्णेस शीघ्र पाठविलें;
पूजोपचारही बहु तत्संगें भास्करार्चनार्थ दिले. २०
माये ! परंतु जी मज मिळवुनि मद्भुजपराक्रमेंच दिली
ती अप्सरोपमा मल्ललना त्या नृपें बळें हरिली ! २१
ज्या सौरीं मज दिधली ती न तयांचीही भीड लव धरितां
धर्मन्याय झुगारुनि झाला तिजला कृतघ्न तो हरिता ! २२
आतां परी तुला हा पुत्र तुझा देवते ! वदे काय
तें एक सर्व—करितों विनति तुला हीच वंदुनी पायः— २३
स्वर्गीं जाउनि भेटुनि दिव्य सभेमाजि देवरायातें,
आधीं त्वां जी केली तत्सेवा सर्व सांग ती त्यातें. २४
अंगारककृत माझा छळ मग त्याला समग्र कळवून
शिक्षा योग्य नृपाला करवीं, वज्रायुधास वळवून. २५
हे माये ! जेव्हां ते होउनियां सर्व एकवट अमर
कोपविती अमरपुरी अमरेशासीं करोनियां समर, २६
सुरवृंदांतुनि कोणी तदितर शक्रा तयीं न कामा ये;
अभिमान ह्या यशाचा तूंच मनीं वाहसी सदा माये ! २७
करुनी बद्ध हरीला धावा कारागृहांत लोटून,
ध्यावें स्वयें सुखानें मग सर्वीं स्वर्गराज्य वांटून; २८

कपटव्यूह असा सुर होउनि सासूय योजिते झाले;
करुनि पुढें वरुणातें जिंकाया पाकशासना आले. २९
स्त्रीजनललामभूता ती देवी ही हरिप्रिया आर्या
सोडुनि पतीस गेली, साह्य कराया स्वकांतारिपुकार्या. ३०
गेला भिवूनि मघवा संकटसमयीं, परंतु त्या माते !
साह्यास आणुनीयां भगदत्त त्वांच रक्षिलें त्यातें. ३१
तो भीमकाम शतभुज दैत्य उभारोनि आपले पाणी
गगनपथानें धांवत आला होता जिथें कुलिशपाणी. ३२
बघतांच त्यास भेणें कांपाया देव लागले सर्व;
शस्त्रें ठेवुनि खालीं, हरिपद धरिती त्यजोनियां गर्व. ३३
ह्या गोष्टीचें जननी स्मरण सुरेंद्रास देउनी आधीं,
मग पाय घट्ट त्याचे धरुनी, हा कार्यभाग तूं साधीं. ३४
वश करुनि, सिंहलाचा पक्ष धरायास त्यास तूं लावीं;
जेणें सौरचमू ही मागें रिपुंनीं पिटोनि लावावी. ३५
समरगणांत साऱ्या सौरशवांच्या पडोनिया राशी,
स्पष्ट कळूं दे कष्टप्रद किति असला हा नृपाळ हें त्यांशीं. ३६
शवमय निरखुनि रणभू मत्ता अंगारकाहि त्या स्पष्ट
वाटूं दे कीं—छळुनी सौरवरा, पावलों स्वयें कष्ट. ३७
ऐकुन ह्या सुतवचना ती देवी खिन्न होउनी फार
तन्नयनांतुनि लागे शोकाश्रूंची स्त्रवावया धार. ३८

\+ + + +

## माझा संसार.

आला वसंत वेली पुष्पभरानें भरारुनी भरल्या;
वाटे बघुनि युवा त्या युवती लज्जांबरास पांघरल्या ! १
विविध विहंगम उडुनी धावरुनी त्या तरूवरी जाती;
करिती मयूर नर्तन पिकही हर्षें वसंतयश गाती. २
वस्त्राभरणीं मंडित हिंडति बहु पौर कन्यकाकुंजीं;
वाटे साराविला तैं तो सारा प्रांत तारकापुंजीं. ३
रुणझुण करिती नूपुर करिती करकंकणें झणत्कृतिला,
गुंजारव भृंगांचा त्यांत मिळुनि वाढवी चमत्कृतिला. ४
निजमुख-कमलश्रीनें कमलश्री लोपवावया सारी,
जलकेलिच्या मिषानें शिरल्या तरुणी कितीक कासारीं. ५
कोणी सरसिजनयना झरझर गुंफीत चालतां सुमनें,
सुमनें न गुंफिती त्या वाटे तरुणांस गुंफिती स्वमनें. ६
कोणी आळवितां सुर गाणीं गाउनि मनोहरें नाना,
म्हणती रसिक अनावर झाल्या आम्हांस आमच्या माना. ७
कोणी गरगर फेरे घेउनि सानंद घालितां फुगड्या,
म्हणती वडिल मुलींनो ! सांभाळा नीट बांगड्या बुगड्या. ८
कोणी पंकजनयना प्रियकर अन्यत्र आपले रमती

पाहुनि सोडुनि धैर्या कुररीसम खिन्नमानसें भ्रमती. ९
कोणी प्रियकरसंगें जाउनि एकान्त पाहुनी बसती;
बघतां सखीजनांनीं मुरडुनि मागें मुखांबुजा हंसती. १०
कोणी कर प्रियानें धरितां बोले तयास सव्रीड,
सोडा सोडा! म्हणतिल जन मज कीं हीस लाज ना भीड. ११
कोणी प्रियकरकंठीं घालाया पुष्पहार जों लागे,
तों ये स्वसखी पाहुनि दचकुनि सारी करांबुजा मागें. १२
ऐशा सुखसमयीं त्या खेळुनि नानाप्रकारचे खेळ,
होतें क्रमित सखींसह आनंदें मीहि आपला वेळ. १३
इतक्यांत एक येतां तरुण पुरुष पाहिला तिथें आम्हीं;
मी काय रूप त्याचें वर्णूं शकती न सर्वथा ब्राह्मी! १४

मनोरंजन, पुणें.

( अपूर्ण. )

## बाजी-राज्यवियोग.

संपूर्ण पूर्वजार्जित ऐश्वर्याची करोनियां होळी
तीर्थाटना निघाला बाजी हातांत घेउनी झोळी. १
पोळ्या घीवर लाडू साखर भातांत जे सदा चूर,
ते म्हणती न बुडे कां पुण्यपुरी येउनी महा पूर ? २
पातिव्रत्यधनावरि पुर-युवतींच्या अखंड जे टपले,
त्या नरपशूंस वाटे कीं आतां रामराज्य आटपलें ! ३
स्वप्नांतही न ज्यांना परधनहरणांत वाटलें पाप,
मेला मेला म्हणती मेला ते आज आमचा बाप ! ४
गाजी बनले केवळ हांजी हांजी करोनि जे पाजी,
ते भाविती सुरद्रुम सोडुनियां जाय आपणा आजी ! ५
रणवाद्यनाद कर्णीं पडतां जाउनि घरांत जे लपले,
हारपलें म्हणती ते वीर शिरोरत्न आज हारपलें ! ६
बीभत्स लावण्यांचीं गाणीं ज्यांच्या मुखीं सदा वसलीं,
विधवा होउनि कविता म्हणती ते आजपासुनी बसली ! ७
न सुचे तहान भूकहि ज्यांना बसतां डफावरी थाप,
ओढवलें म्हणती ते रसिकांचें यापुढें पुरें पाप ! ८

दिवसा निजून रात्रीं नाच तमाशे पहात जे फिरले,
वाटे पुण्यपुरीचें पुण्य तयांना समग्रही सरलें ! ९
ज्यांनीं कधीं न वेश्यावेश्माबाहेर काढिला पाय,
देश बुडाला म्हणुनी रडती ते मोकलोनियां हाय ! १०
भिक्षा मागावी हें धर्माचें मुख्य ज्यांचिया वर्म,
गेला निजधामाला म्हणती ते आज आमचा धर्म ! ११
संध्यावंदन करितां यावी ज्यांना क्षणक्षणा झोंप,
ते म्हणती कर्माचा आतां होणार सर्वथा लोप ! १२
पुस्तक बघतां ज्यांना वाटे बसतात मस्तकीं घांव,
ते म्हणती विद्येचें आतां घ्याया नको पुन्हां नांव ! १३
कवडीही न ज्यांनीं कोणाच्या लाविली कधीं हाता,
ते म्हणती दात्यांची सरली अवतारमालिका आतां ! १४

मनोरंजन, पुणें.

( अपूर्ण )

## सर्व हिंदुधर्माभिमानी लोकांस विज्ञापना.

[ संमतिवयाच्या बिलास प्रतिकूल असलेल्या हिंदु लोकांची सभा साली माधवबागेंत झाली होती. तेथें ही पद्यात्मक विज्ञापना वांटण्यांत आली. ]

हा ! हा ! सुज्ञ तुम्ही असोनि करितां हा काय वेडेपणा !
आहे काय पुढें अरिष्ट नकळे हें काय हो आपणा ?
वाटे आज बरें; परंतु तुमच्या ह्या वर्तनानें उद्यां
सारे मित्र दुखावतील इकडे कांहीं तरी लक्ष द्या ! १
जातां ह्यूम विलायतेस असल्या पाहोनि ढंगांस या
आशा 'राष्ट्रसभे'समेत तुमच्या जातील साऱ्या लया !
वेडर्बर्न म्हणेल हाय ! डिगबी-फेरोजशा-सारखे
एकामागुनी एक सोडुनि तुम्हां जातील सारे सखे ! २
ऐशी होउनि आपसांत दुफळी माजेल जेव्हां कळी
द्वेषाचा धडकेल घोर वणवा देशोन्नतीच्या मुळीं !
शास्त्री पंडित राहतील सदनीं, शास्त्रार्थही पुस्तकीं,
तेव्हां ताडुनि घ्याल आपण शिरें आपापल्या हस्तकीं ! ३
सारे देतिल सा[1]धल्यासह तयीं देशाभिमाना रजा,
आनंदें म्हणतील शत्रु सगळे ही छान झाली मजा !
हा ! हा ! दुःसह जो प्रकार असला होणार हा त्याकडे
आधीं देउनि दृष्टि आर्यजन हो पाऊल टाका पुढें ! ४

१ शिवराम वामन साधले त्यावेळचे एक सनातन-धर्माभिमानी वक्ते.

जातो काळ जसा जसा तसतसा नेईल तो आपणां,
वाटे काय तुम्हां टिकेल तुमचा हा त्यापुढें मीपणा ?
केले अर्ज तुम्हीं सभा भरवुनी आतां सहस्रावधी,
जें होणार तुम्हांस तें चुकवितां येणार नाहीं कधीं ! ५
होतो काय अधर्म ? धर्म बुडतो ह्या कायद्यानें कसा ?
दोन्ही प्रश्न तुम्हीं करा प्रथम हे आपापल्या मानसा !
आहे देव तुम्हां समोरचि उभा पाहोनि त्याच्याकडे
लागा ढंक करावयास मग तो जो जो तुम्हां आवडे ! ६
सारासार विचार आज तुमचा लावून घ्यावा कसा—
आहे आणियला प्रसंग म्हणुनी विश्वंभरें हा असा !
व्हा व्हा ह्यांतुनि पार आर्यजन हो निर्दोष ! नाहीं तरी
दोषाचें तुमचीं मुलेंच तुमच्या देतील ओझें शिरीं ! ७
भक्तांचें न तुझ्या अतःपर पुन्हा लोकांत व्हावें हसें—
इच्छा हीच जरी खरोखर तुझी त्रैलोक्यपाळा असे,
आहे उद्भवलें अलौकिक तरी हें गौडबंगाल जें
तें सारें **व्रजजीवना**[2] निरसिलें त्वां **माधवें**[3] पाहिजे ! ८

'दूरदर्शी.'

---

[2] सभेचे अध्यक्ष शेट वर्जीवनदास माधवदास; (पक्षीं) [3] माधवबागेंतील अधिष्ठात्री देवता श्रीलक्ष्मीनारायण

# वधूवरांस उपदेश.

वधूस-

बाळे ! आज तुझी विवाहघटिका आली असें पाहतां
जीचा ह्या जगतींतही न बहुधा आनंद सामावता,
जाई ती जननी त्यजोनि चवथ्या वर्षींच जेंव्हां तुला
सारा सोंपुनि कार्यभाग इथला माझ्याकडे आपुला; १
तेंव्हांपासुनि वाढवीत असतां प्रेमें तुला सर्वदा
नाहीं माय तुझी स्मरूं तुज दिली म्यां द्वारके ! ती कदा.
स्वांगें सर्व तुझे लळे पुरवितां कामें दुरी सारिलीं,
मुद्रा खिन्न परी न एक पळही होऊं तुझी म्यां दिली. २
केले लाडचि म्यां न केवळ तुझे, जें जें मला वाटलें
कामीं फार पुढें पडेल तुजला तें ज्ञानही अर्पिलें.
प्रेमें आजवरी करोनि सगळें कर्तव्य हें यावरी
बाळे ! लोभ तुझा त्यजोनि तुज मी देतों पतीच्या करीं. ३

(साक्या.)

'जा, पतिसदनीं जा !' म्हणतां तुज वाटे खेद मनाला,
लोटे नयनीं अश्रुपूर हा कंठहि सद्गद झाला. ४

न करीं चिंता, स्वस्थ सासरीं आनंदानें राहीं !
न रुचे वडिलां करूं नको गे बाळे ! ऐसें कांहीं. ५
कुलमर्यादा उणी गळसरीह्यनि न तुवां मानावी;
विनयें पतिची वडिलांचीही ममता संपादावी. ६
असति माणसें सासरचीं हीं फार तुझ्या ममताळू;
म्हणति, ‘ मुलीसम तुला आपुल्या प्रेमें संतत पाळूं.’ ७
प्रेम तयांचें तुजवर बसलें ऐसें ऐकुनियां हीं
वियोगबाधा शमेल वाटे माझी मजला कांहीं. ८

वरास–

माझी ही तुमच्या करीं निरविली जी द्वारका आज मीं,
प्रेमें पाळित जा तिला निशिदिनीं नागेशराया ! तुम्ही.
अन्योन्यांप्रति भूषणप्रद तुम्ही झालां असें पाहिलें,
कन्यादानविधानपुण्य म्हणजे माझें मला पावलें. ९

५ मे १८९२.

## अभिनंदन.

—:०:—

[ नामदार रा. रा. काशिनाथ त्रिंबक तेलंग यांस मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हायस-च्यान्सेलर नेमिल्यामुळें झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरितां मुंबईतील 'हिंदु युनियन क्लब' या संस्थेनें त्यांस पानसुपारीस बोलाविलें होतें. त्यावेळीं पुढील कविता म्हणण्यांत आल्या. ]

नाहीं आज जिथें स्वराज्य, तिकडे होतां गुणांची चहा
नाना तर्क करोनि लोक म्हणती—'झाला चमत्कार हा !'
ज्यांना, पंत ! परि प्रभाव कळला आहे गुणांचा खरा
आनंदेतर भावना न सहसा त्यांच्या शिवे अंतरा ! १

जन्में भूषविती स्वकीय कुळ जे, जन्माहि विद्यार्जनें,
विद्याही विनयें, तसा विनयही तेजस्वितेच्या गुणें,
सौजन्यें निज तेजही,—निपजतां ऐशीं तुम्हांसारखीं
रत्नें, आपणची तिथें प्रगटती त्यांचे खरे पारखी ! २

तसा मिळुनि पारखी तुमचिया गुणांचा खरा
मनोरथहि आमचा खचित आज झाला पुरा;
गुणी असुनियां तुम्ही बहु गुणज्ञही, योजना
विशेष रुचली असे म्हणुनि ही जनांच्या मना ! ३

गेलों मोहुनियां गुणांस तुमच्या आम्ही मराठे जसे,
हिंदुस्थानहि लुब्ध सर्व तुमच्या कीर्तीस झालें तसें.
आला हा दुसरा प्रसंग; तिसरा चौथाहि तैसा पुढें
यावा सत्वर,—मागतों प्रभुवरापाशीं सदा एवढें !

## " देव म्हणजे काय ? "

हा ! हा हें पुसतोस काय ? वदशी हें काय पाखंड रे ?
तर्कालाहि अतर्क्य तो प्रभु कसा त्वां जाणिजे पामरें ?
जा जा ! प्रश्न नको असा मज करूं ! होशील पापा धनी !
शंका ही असली भयंकर पुन्हां आणूं नको रे मनीं ! १
घेती हार विचार ज्या हुडकितां, भांबावल्या कल्पना;
बुद्धीची पडली गळोनि सगळी जेथें अहंभावना;
झालें कुंठित शब्दशास्त्र जिकडे, तर्कास आली जरा;
तो निःसीम निरंजन प्रभु कसा तूं जाणशी पामरा ? २
जी ही चित्रविचित्र विश्वरचना आहे तुझ्याभोंवती
जा हा प्रश्न तिलाच तूं कर, पहा सांगे तुला काय ती?
आहे साक्ष समोर ती न बघतां, बुद्ध्याच तूं आपणा
डोळे झांकुनि आंधळा म्हणविशी, हा काय वेडेपणा ? ३
जागा हो ! निजतोस काय ? बघ ह्या ब्रह्मांडभांडोदरीं
आहे तोच चराचरांत अवघा सर्वांतरात्मा हरी !
जा कोठेंहि, पहा कुठें निरखुनी, मागें पुढें भोंवती—
ओतप्रोत तिथें दिसले भरली त्याचीच सारी कृति ! ४

## शारदोत्सव.

[ आर्यन एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल, गिरगांव, ह्या विद्यालयांत दसऱ्याच्या मुहूर्तावर पुस्तकालयाची स्थापना झाली. त्यावेळीं, पुढील श्लोकांपैकीं पहिले तीन म्हणण्यांत आले होते. ]

क्रीडा स्वैर करावयास इकडे येऊन राहे तरी
ल्याया आभरणें न, यास्तव झुरे वागीश्वरी अंतरीं;
हें आश्चर्य म्हणेल कोण ? बघतां सर्वत्र लोकांत या,
साऱ्या भूषणलोलुपाच असती जातिस्वभावें स्त्रिया ! १
होशी खिन्न कशास ? घे भगवती हीं आपलीं भूषणें !
एकाहूनि विशेष एक असती हीं आपुलाल्या गुणें.
नाना शास्त्रविशारदीं करुनियां निर्माण जे जे दिले
ते ते सुंदर दागिने तुजपुढें आहेत हे ठेविले. २
घे हीं लेउनि भूषणें झडकरीं आरूढ सिंहासनीं
देवी होउनि आपल्या, जड जनां दे स्फूर्ति विद्यार्जनीं !
यांना आरभणीं तुला निरंवितां पाहूनियां ह्या मुदें
आम्ही सोत्सव **शारदोत्सव** करूं ह्या **शारदीं शारदे** ! ३
देवी ! दे वर हाच कीं भर तुझ्या ह्या ग्रंथरत्नीं पडो !
कांहीं त्वद्भजनाशिवाय दुसरें नारीनरां नावडो !
इच्छा हीच असे—तुझी करुनियां सेवा तपेंच्या तपें
ज्ञानाचे भुवनीं फिरोत जन हे वांटीत सोनें रुपें ! ४

## संक्रांतीचा तीळगुळ.

( झंपा )

तीळ घ्या गूळ घ्या । गोड बोला ॥
आज संक्रांतिचा सुदिन आला । ध्रु० ॥
घेउनी सोबती । खेळ केले किती ॥
हांसतां खेळतां । वर्ष गेलें ॥
पुस्तकें वाचिलीं । पाठ केले धडे ॥
मोडिले आंकडे । कौतुकानें ॥ १ ॥ तीळ घ्या०
सान मोठ्या भल्या । त्या परीक्षा दिल्या ।
बाक्षिसें घेउनी । हर्षलों कीं ॥
सद्गुणाच्या तिळा । प्रेमपाकीं मळा ।
हाचि हो आपला । तीळ गुळ ॥ २ ॥ तीळ घ्या०
श्रीहरीच्या पदा । हेंच मागों सदा ।
दे विभो संपदा । सद्गुणांची ।
कल्पतरु याचका । इच्छिलें दे तरी ।
क्षुद्र धन जाणता । काय मागे ॥ ३ ॥ तीळ घ्या०

आनंद, जानेवारी. १९०८

## महाराष्ट्रजनविज्ञापना.

[ महाराष्ट्र-साहित्यपरिषदेचें साहवें संमेलन बडोदें येथें १९०९ सालीं श्रीमंत **सयाजीराव महाराज गायकवाड** यांच्या उदार आश्रयाखालीं भरलें होतें. त्या संमेलनाचे अध्यक्ष आणि सभासद यांस उद्देशून कवीनें हें काव्य लिहून संमेलनाकडे पाठविलें.]

विद्याकलाकुशलता जिकडे धांवूनि आश्रया आल्या,
झुंडी गुणी जनांच्या पात्र जिथें नित्य आदरा झाल्या; १
ज्याच्या गुणवत्तेची चारी खंडांत पसरली द्वाही,
राजा असा **सयाजीराव** जिथें नांदतो गुणग्राही; २
प्रेमें निज भाषेच्या अभिवृद्धीचें करावया कार्य,
त्याच **बडोद्या**मध्यें आज तुम्हीं सर्व पातलां आर्य ! ३
अभिमान ह्या **मराठी** भाषेचा अल्पही असे ज्याला,
वाटेल ह्या प्रसंगीं आली आनंदपर्वणी त्याला. ४
ह्या पर्वणींत घ्यावा आनंदाचा अवश्य मीं वांटा;
काय परंतु करावें ! कांट्यांनीं सर्व रोखिल्या वाटा ! ५
औषध घेत असावें, पथ्य करावें जपून, ह्यावीण
नुरके कार्य दुजें मज; करितां होतो तनूस ह्या शीण. ६
असल्या स्थितींत सेवा करवेना आपली मला आज—
हें सांगताहि बुध हो ! माझी मजलाच वाटते लाज. ७

राहो आत्मकथा ही, कार्य न कांहीं हिच्याविना अडलें;
विषयाकडे वळूं त्या लक्ष्य जिथें सर्व आपलें जडलें. ८
'जीवनकलह भयंकर आहे सर्वत्र चालला लोकीं,
त्यांत पडोनि सुरक्षित ठेवावीं आपलीं कशीं डोकीं ?' ९
प्रश्न न तुमच्या तुमच्या भाषेच्याही पुढें असे हाच;
घोर न तुम्हांस केवळ तीसहि त्याचा करीतसे जाच. १०
जाच सहेल कसा तरि; जीवितसंशय परी जिथें आहे,
जोडुनि हात केवळ कोण शहाणा तिथें उभा राहे ? ११
अस्तित्वावर तुमच्या भाषेच्या जो चहूंकडुनि घाला
पडला संप्रति आहे कोण तुम्हांविण निवारिता त्याला? १२
**हिंदी** म्हणते माझा सर्वांवरि चालवीन मी पगडा;
आमरणान्त तिथें तों **उर्दू** म्हणते करीन मी झगडा. १३
मी लाडकी नृपाची, हो मज सांगेल कोण माघारीं ?–
ऐसें म्हणूनि दारें बसली अडवूनि **इंग्रजी** सारीं. १४
कोण तुम्हांविण आहे संकटसमयीं अशा हिला त्राता ?
बघते तुम्हांकडे ही दीनमुखें म्हणुनि भारतीमाता. १५
**हिंदी**सम मृदु मधुरा **उर्दू**समही नसेल ही नटवी;
वैचित्र्यांतही मागें **बंगाली**ला जरी न ही हटवी; १६

मुग्धा **गुजराथी**सम **कर्नाटी**सम कलावती नाहीं;
न म्हणोत **तेलगू**सम भाषाशास्त्रज्ञ हीस ललिताही; १७
बसलें साहित्याची बळकावुनि मीच संपदा सर्व--
येई न **इंग्रजी**सम हाहि जरी वाहतां हिला गर्व; १८
हीचें परंतु सात्विक शुद्ध महोदात्त पाहुनी शील
वाणी हिच्या पदावर निज मस्तक कोणती न घांशील? १९
प्रेरी दर्भधरांसहि रणदीक्षा देउनी समररंगीं,
आहे सिद्ध म्हणाया कोण न तेजस्विता हिच्या अंगीं ? २०
जी **ज्ञानराज**वदनें दुसरी गीताच विस्तृता वदवी,
सामान्य कोण तुमच्या वाणीचों त्या म्हणेल हो पदवी? २१
शिंपी असोनि भगवद्भक्तीचा ब्राह्मणांहि ओनामा
पढवुनि हिच्या प्रसादें वर्णगुरुत्वास पावला **नामा**. २२
**गार्गीमैत्रेयी**ही कर जोडुनि लागल्या जिच्या भजनीं,
बटिकही **नाम्या**ची ती वंद्य कृपेनें हिच्याच होय **जनी**. २३
श्राद्धीं अनामिकांना[1] जेववुनी 'तृप्त व्हा' म्हणे पितरां--
वदवील विप्रवदनें शब्द असे कोणती गिरा इतरा ? २४
पुरवुनि रसिक जनांचें **नाथां**च्या नातवां[2]कडुनि कोड,
हीच सुधेस म्हणाली--सोड अहंता गडे तुझी सोड ! २५
**भगवंता**च्या दारीं नाहीं कोणीहि उंच वा नीच,
हें धर्मतत्त्व कळवी सर्व **महाराष्ट्र**मंडळा हीच. २६

---

१ महारांना. २ मुक्तेश्वराकडून.

पायीं अनामिकांच्या विप्रांचीं हीच लोळवी डोकीं;
राम–रहीम–जिनांना निर्मत्सर हीच नांदवी लोकीं. २७
तेली वाणी उदमी मांगमहारांसवें तुक्याभंवती
रंगाशिळेवर एक्या द्विज भूभुज हीच होय नाचविती. २८
अभिमान संस्कृतीचा त्यजुनि जिचा दास **वा**मनस्वामी
राहे अखंड होउनि, काय रसाचें उणें तिच्या धामीं ? २९
गुंफुनि अष्टोत्तरशत **रामायण**मालिका गळां घाली
प्रभुच्या,अशी हिच्याविण वाणी जन्मास कोणती आली? ३०
प्रेरुनियां ऐक्याचें बीज महाराष्ट्रमंडळामाजी
झटली ह्या भूमीच्या उत्कर्षाच्या न काय ही काजीं ? ३१
दिग्विजयार्थ **शिवाजी**राय भवानीस ह्याच आराधी;
गादीहि **मोंगलांची** हीच महाशक्ति हालवी आधीं. ३२
हीच **मराठ्यां**कडुनी अटकेपर्यंत नेववुनि कटका,
फडकावयास लावी सिंधुनदीच्या तटीं जरीपटका. ३३
**चि**पळूणकराकरवीं हीच **महाराष्ट्र**देश खळबळवी,
साहीं हिच्याच **आ**गर-करहि विचाराकडे जनां वळवी. ३४
'तेजस्विनी अशी ही भाषा होणार आपली नष्ट'–
हें म्हणतांही होती रसनेला ह्या किती तरी कष्ट ! ३५
आला परंतु आहे काळ असा स्पष्ट वांकडा आज;
कीं न वदावें वदतां तेंहि न वाटे मनास ह्या लाज. ३६

न म्हणा दुर्दैवानें हीस अशी संकटा दशा आली,
कारण हिला अनाथा केवळ तुमचीच हो असे झाली. ३७
होते अजाण म्हणुनी लिहिल्या बखरीच मात्र वडिलांनीं;
खणिल्या परंतु सांगा साहित्याच्या किती तुम्हीं खाणी ? ३८
असतां तुम्ही निरंतर आंग्लकथाकाव्यनाटकीं दंग,
वक्तृत्वासहि तुमच्या चढत नसे **इंग्रजी**विना रंग ! ३९
पत्रें निरोप आज्ञा तुमच्या त्या **इंग्रजीं**तची जाती,
वाटे लाज तुम्हांला ग्रंथ **मराठी** धरावया हातीं ! ४०
लेखन वाचन मनन ध्यान सदा **इंग्रजीं**तची चाले;
किंबहुना ? मन तुमचें आहे संपूर्ण **इंग्रजी** झालें ! ४१
कारण हिच्या विनाशा ह्याच कृती सर्व आपल्या झाल्या;
कृतिच न ह्या विकृति हिच्या घात तनूचा करावया आल्या! ४२
असतां अशा स्थितींतचि शंभर वर्षें न जात जों पुढलीं,
समजा तोंच **मराठी** भाषा निष्प्राण होउनी पडली ! ४३
तुमच्या जन्ममहीची मालवतां हींच जीवनज्योति,
राहील जीव धरुनी केविं **महाराष्ट्र**भूमिका हो ती ? ४४
ही जातांच **मराठे** लोकांचें नांवही नुरायाचें;
जोशी हवा कशाला कोणी भाकित करावया याचें ? ४५
नाहीं हिला नृपाश्रय म्हणुनि नका ही म्हणूं दशा आली;
काय सहाशें वर्षें वाढ हिची त्याविना नसे झाली ? ४६

त्या **रामचंद्र**देवें **ज्ञानोबा**ला दिले किती गांव ?
आळविला **नाम्या**नें भजनानंदांत कोणता राव ? ४७
सोडुनि पाय **हरीचे नाथ** धनास्तव कुणीकडे जाय ?
**मुक्तेश्वरें** कधीं त्या राजद्वारांत ठेविला पाय ? ४८
नव्हती छत्रपतीची स्वारी भेटीस आपल्या आली
तोंवरि **समर्थ** बसले ठेवुनियां काय लेखणी खालीं ? ४९
नव्हता काय **तुकोबा** जातीनें पाहतां खरा वाणी ?
विकली परंतु त्यानें केव्हां कोणास आपली वाणी ? ५०
यत्कृति रसिकजनांना निज शीर्षें डोलवावया लावी
मानी **वामन** भरवी रस कोणाकडुनि तो 'भरतभावीं' ? ५१
ज्या **पंता**च्या मागें कवितादेवीस लागली झोंप,
त्याच्या वाग्वल्लीचें कोण नराधिप भरारवी रोप ? ५२
हा न धनाचा महिमा, भक्तीचा खेळ होय हा सगळा;
वाढविली ही भजकीं, अन्यांच्या ही कधीं पडे न गळां. ५३
त्यांनीं अनन्यभावें प्रेमाचा शुद्ध चारुनी चारा,
दोहुनि ह्या सुरभीला वर्षविल्या दिव्य वाक्सुधाधारा. ५४
दोग्धे गेले, पडली चाऱ्याचीही चहूंकडे वाण,
म्हणुनीच आज दुःसह झाला आहे हिला हिचा प्राण ! ५५
घाला यास्तव घाला प्रेमाचा हीस आपल्या चारा !
दोहून हीस भावें आलेल्या प्राणसंकटा वारा ! ५६

द्याल तुम्ही थोडें तरि ही तें मानून फार घेईल;
प्रेमें दिलें तुम्हीं जें त्याहुनि शतपट तुम्हांस देईल ! ५७
दोहाळ हीस तों तों अधिकाधिक ही प्रसन्न होईल;
पुरवुनि अभीष्ट तुमचें क्लेश महीचेहि ह्या न उरवील. ५८
तुमची न आमची वा, वाणी ही होय **देवराष्ट्र**गिरा;
दैवानेंच असे ही झाली संप्राप्त आपणां रुचिरा. ५९
असल्या तथापि दुसऱ्या केवळ आहेत राष्ट्रभाषा त्या;
आहे परंतु लोकीं हीच महाराष्ट्रभारती जात्या. ६०
अभिमान हा स्वचित्तीं वागवुनी यत्न पाहिजे केला;
येईल आपल्या ह्या सुदशा तेव्हांच मायभाषेला. ६१
झाला पद्ययुगाचा अंत परत्रीं **पराडकर** जातां;
माध्यान्हीं गद्याचा आहे सूर्य प्रवेशला आतां. ६२
त्याच्या द्युतींतच हिला भर घालाया नवी नवी लावा !
तेजस्विता हिचीच न तुमचीही सर्व भूतला दावा ! ६३
विविध कलाकौशल्यीं शास्त्रांवरही हिची प्रभा पाडा !
धाडा हिच्या यशाचा परिमल दाही दिशांकडे धाडा ! ६४
उद्धरुनी हीस असें घ्या करुनी आपलाहि उद्धार !
विज्ञापना असे ही, सुज्ञांना सांगणें नको फार ! ६५
मागाल त्या **सयाजी**रायापासून हेंच तरि मागा–
कीं जागवूनि लोकां आपणही रक्षणीं हिच्या जागा ! ६६

लक्ष्मीसरस्वतींना निर्मत्सर वागवूनियां सदनीं,
म्हणवुनि घेतां झालां धन्य तुम्हीं आपणास जनवदनीं. ६७
करुनी प्रजाजनांचें लालनपालन अमोघ वात्सल्यें,
राहूं दिलीं न आपण दुःखांचीं त्यांचिया मनीं शल्यें. ६८
चाखुनि महार मांग ज्ञानतरूच्या सुरम्य गोड फळां
म्हणती,—औदार्याचा आहे तुमच्या प्रभाव हा सगळा ! ६९
नाना कला कुशलता लावुनि राष्ट्रीं विहार करवाया,
निजजनसमुन्नतीचा आहे घालुनि तुम्हीं दिला पाया ! ७०
मन तुमचें न सुसंमत नीतिपथापासुनी कधीं ढळलें !
आले प्रसंग नाना शीलहि तुमचें नसे तरी मळलें ! ७१
**दिल्लीं**तही **मराठे** लोकांचा दावितां तुम्हीं बाणा,
**आर्य**प्रसूहि वदली—पुत्र खरा हाच जन्मला दाणा ! ७२
ह्या गुणगणांत तुमच्या प्रेम वसो ह्याहि मायभाषेचें !
आहे बीज न केवळ फळहि हिच्या ह्यांत सर्व आशेचें ! ७३
वाग्वैभव न **मराठे** लोकांची सद्यशःपताका ही
वडिलांपाशीं तुमच्या समजुनि माहेर आपलें राही ! ७४
ही आपलीच कन्या धन्या ती जेंवि **इंदिरा**राजा !
तीस तसेंच हिलाही प्रेमानें वाढवा महाराजा ! ७५
द्रव्याची न भुकेली प्रेमाची हौस आवडी फार;
कीं त्यावरीच सारा जीवित्वाचा हिच्या असे भार. ७६

घांस हिला प्रेमाचे म्हणुनि **सयाजी**नृपा ! तुम्ही भरवा !
वाढवुनी शक्ति हिची हिजकडुनी लोकजागृती करवा ! ७७

जाल तुम्ही त्या मार्गे **राया** तुमच्या प्रजाहि जातील !
भारहि तुम्हांसवें ह्या सत्कार्याचा सुखें वहातील ! ७८

ही ज्ञानदीपिका मग अखिल जनांच्या घरोघरीं फिरवा,
**पुण्यश्लोक**समाजीं **जनक–युधिष्टिर–अशोक**से मिरवा ! ७९

शहर **बडोद्या**करवीं **उज्जयनी**च्या यशोधना हरवा !
**विक्रमभोजां**मागें तत्सम कीर्ति क्षमातळीं उरवा ! ८०

## स्वागतम् ! सुस्वागतम् ! !

झाली वर्षशतावधी जनमनां बाधा जिची दुःसहा,
गेली ती विलयास आज रजनी निःशेष गेली पहा !
भाग्याचा उदयास ये दिनमणी ! झाली प्रभूची कृपा
आम्ही आज पहातसों म्हणुनि ह्या मूर्धाभिषिक्ता नृपा ! १
गातां ऐकतसों घरोघर कथा रामादिकांच्या जनीं,
राज्यारोहणवर्णनेंहि रुचिरें वर्णून गेले मुनी,
राया आजच ह्यापरी तुजसमा मूर्धाभिषिक्ता नृपा
पाहे आर्यमही; अशीच म्हणतों व्हावी पुढेंही कृपा ! २
या या **पंचम जॉर्ज**राय ! सुभगे ये राजराजेश्वरी !
येतां आज तुम्हां विलोकुनि इथें हर्षा उरेना उरी.
ज्या प्रेमें इतका प्रवास करुनी आलां तुम्ही भारतीं
त्या प्रेमेंच तुम्हांस ही भरतभू ओवाळिते आरती ! ३
आजीनेंच तुझ्या न केवळ तुझ्या तातेंहि विश्वस्तुतें
प्रेमाचें सुदिलें प्रजाजनमनोभूमीमध्यें रोप तें;
स्वांगें शिंपडितां स-दार-सचिव क्ष्मापा तुला पाहुनी
राया ! आर्यमही चिरंतन तुझी झाल्ये म्हणे मी ऋणी ! ४
प्रेमाचे ध्वज रोविले, उभविल्या हर्षोत्सवाच्या गुढ्या,
व्हाया पायघड्या पथांत पडल्या सद्भावनांच्या उड्या;

या ह्या आर्यजनीं सुवर्णभुवनीं या राजराजेश्वरा !
आहे हें घर आपलें समजुनी संचार येथें करा ! ५
राजा विष्णुसमान मान जिकडे झाला सदा पावता,
आजी होउनियां तुझीच बसली आहे जिथें देवता,
येतां पाहुनियां सभार्य तिकडे सम्राण्नृपा त्वत्समा
वाटे ह्या भुवनीं रमाधव सवें घेऊन आला रमा ! ६
श्रीरामा जनकात्मजा, द्रुपदजा त्या धर्मराया जशी,
सान्निध्यें सुखवोनि संतत तुला ही त्वत्प्रियाही तशी
लोकीं ह्या म्हणवोनि लोकजननी हो वाढवीती सदा
सौभाग्यासह आपल्या नरवरा तूझी यशःसंपदा ! ७
हिंदू हो अथवा अविंध नृप, जो जोपा जनांची करी
त्याला कंठमणी म्हणोनि हृदयीं ही आर्यमाता धरी;
निष्ठा रामयुधिष्ठिरीं अकबरीं ठेवोनियां सारखी
झाली वागविती समान सकळां ही सज्जनांची सखी. ८
डोळे घालुनियां असेल बसली जी त्वत्पथीं मावली
आईची ! न सरी जरी नृपवरा ही त्या तुझ्या पावली,
राया हो न तिची तुला प्रतिपदीं ह्या दूर देशीं स्मृती
औत्सुक्यें म्हणुनी सदा तव हितीं राहील ही जागती. ९
जा संचार करा सुखें नरवरा सर्वत्र ह्या भारतीं !
लोकांच्या तव दर्शनास्तव उभ्या आहेत झुंडी पथीं !

या या भेटुनियां तयां, विदितही त्यांना करा स्वाननें—
'गेला भेद विरोनि, एकवटलीं राजाप्रजांचीं मनें !' १०

राया ! दर्शन देउनी सुखविलीं चित्तें जनांचीं जशीं
केली स्वागमनेंहि पावन तुम्हीं ही पुण्यभूमी तशी;
आहे आपण हा घडा नृपवरा घालोनियां जो दिला
तो ठेवोनि पुढें प्रजाहि तुमची जोडो यशा निर्मला ! ११

तूं आलास तुझी तशीच इकडे आंग्ल प्रजाही वळो !
वर्णद्वेष जळो ! अहंकृति गळो ! संदेहबाधा टळो !
प्रेमें प्रेम वळो ! विरोध वितळो ! बंधूस बंधू मिळो !
निष्ठा अव्यभिचारिणी प्रभुपदीं सर्वत्रही आढळो ! १२

## आर्य-मातृसंदेश.

[ दिल्लीस लॉर्ड हार्डिंग साहेबांवर १९१२ सालीं बॉंब फेकण्याचा जो अत्याचार झाला त्यास अनुलक्षून ही कविता रचण्यांत आली. ]

हो **राम** वा **रहिम** हो अथवा **यहोवा**,
हो **ख्रिस्त** वा **सुगत** वा **जरदष्ट** हो वा,
सर्वांसही विनवुनी म्हणते सदा जी—
निर्वैर धर्मपरिपालन चालवा जी ! १
हा **आर्य**, तो **यवन**, तो **यहुदी फिरंगी**—
हा भेदभाव न शिरेच यदन्तरंगीं;
जीला म्हणून जन भिन्नमतानुयायी
आपापली समजती ममताळु आई. २
येई सुखें न करितां निजधर्मरक्षा,
घ्याया धजे न मनंही परधर्मदीक्षा,
जे सोडिती म्हणुनि देशहि आपलाले—
तेंही जिचा धरुनि आश्रय तुष्ट झाले. ३
आर्योत्तमा **भरत-राम-युधिष्ठिरांना**
वात्सल्य जें प्रगटवी कुरवाळितांना,
तें दावितां **अकबरीं** यवनींहि झाला
सापत्नभाव शिवता न जिच्या मनाला; ४

... ग्रंथालय ...
९८९६

दे अन्नवस्त्र विमलोदक आश्रितांना,
पोशी मुलासम वनस्पति दिव्य नाना,
जी **स्वर्णभू** कनकरत्नखनीस थारा
देवोनि भूषित करी नरलोक सारा; ५
निष्काम धर्मनियमें व्यवहार सारे
सारोनि पुण्यधन संतत सांचवा रे!—
पाजोनि हें सतत बाळकडू मुलांना
जी पावली विहित **पुण्यधरा**भिधाना; ६
लावात्रया मल तिच्या सुयशःपटाला
पोटीं तिच्याच नरराक्षससंघ आला !
ही **आर्यभू** म्हणुनि घालुनि मान खालीं
सव्रीड **आर्य**जन हो नयनाश्रु ढाळी ! ७
म्हणे—ज्यांच्या योगें अहह ! मम सच्छील मळलें,
दुरात्म्यांचे गर्भ प्रथमचि तयां कां न गळले !
कुलांगारां ऐशा प्रसवुनि जगीं ह्या सुतवती
जयां व्हावें वाटे, खचित विवशी त्या, न युवती ! ८
अहा ! पाप्यांनो ! जो जनपदहितीं नित्य झटला,
पुढें आलीं विघ्नें लवहि तरि मागें न हटला,
घरीं दारीं गाती अखिल जन यत्कीर्ति विमला,—
तुम्हां तो कां वध्य स्वजनहितकर्ताच गमला ! ९


राजा ये, पुरवी अभीष्ट, नुरवी उद्विग्नता, त्यामुळें
होतीं वाटत जीं समूळ विलया गेलीं अनिष्टें खुळें;
गेलें वर्ष न तोंच वेड तुमच्या चित्तीं पुन्हा तें शिरे,
पापांचा तुमच्या घडा न म्हणुनी अद्यापि वाटे भरे ! १०
दुष्टांनो ! तुमच्या करें गजपुरीं*जो बॉंब-गोळा उडे
तो मध्येंच फुटोनि कां न तुमचीं विच्छिन्न झालीं धडें?
व्हावी दूषित भू तुम्हांसम खळां वाहोनि पृष्ठीवरी,
होतें फार बरें तिथेंच तुमचा होता चुराडा तरी ! ११
काळें कर्म असें करोनि खळ हो ! झांकोनि काळीं मुखें
कोठें जाउनियां लपूनि बसलां रात्रिंचरासारखे ?
नाहीं आज तरी उद्यां स्वकृतिचा झाडा तुम्हां दुर्जनां
देणें भाग पडेल ! त्या चुकवितां येती कशा यातना? १२
काढा नरापसद ते हुडकून काढा !
झाडा कलंक जडला स्वयशास झाडा !
निर्वेध ते विचरती खळ ह्या प्रदेशीं
तों सौख्य माय तुमची वरणार कैशी ? १३
वधस्तभीं त्यांचे अवयव न जों लोंबकळती,
क्रियानष्टांना त्या त्यजुनि असु त्यांचे न पळती,

---

* हस्तिनापुरीं=दिल्लींत.

शवें त्यांचीं केलीं करटशुनकीं जों न शतधा,
हिच्या पावेना तों तळमळ मनाची शम कदा! १४

होती राक्षस ते, मनुष्यतनु दे धाता चुकोनि तयां!
गेले ते न अधोगतीस तंव ही होई न भू निर्भया!
कांटे ते उपटोनि यास्तव, वृथा माझ्या यशा जो जडे
टाका तो धुउनी कलंक सुत हो! मी मागतों एवढें! १५



# हार्डिंग-जन्मदिनोत्सव.

( आर्या. )

षण्मास लोटले तरि कांपवि हृदया अझून यत्स्मरण,
ही सर्व शब्दसृष्टिहि ज्याचें न करूं शके तिरस्करण; १
जें घोर वृत्त ऐकुनि शुचि यश मम **आर्यभू** म्हणे मळलें,
आबालवृद्ध जन आ-सेतुहिमाचल उदंड हळहळले; २
'पूर्वी जसा **पुरोचन** देऊं जातां **पृथासुता** ताप '
म्हणती लोक 'तसा हा दग्ध न कां जाहला महा-पाप?' ३
प्राणव्यसनीं पडला केविं अहा लोकमित्र **हार्डिंग** !
वांचेल तो कसा ह्या चिंतेंतचि लोक जाहले दंग. ४
स्तविती विनविति नवसिति दीनमुखें आपआपल्या देवां;
याचिति '**विभो** ! सुरक्षित इतका हा ठेव आमुचा ठेवा !' ५
पुण्यप्रभाव **सतिचा** फळला, करुणाघन **प्रभू** वळला;
दुर्धर पाश **यमाचा** गळला, घोर प्रसंग तो टळला. ६
उगवे म्हणुनि गडे हो ! आनंदाचा अपूर्व हा दिवस;
फळले कां न म्हणूं ते केले आपण उदंड जे नवस ? ७
गाऊं **प्रभुगुण**, मागूं पाणिद्वय जोडुनी तयापाशीं:
' संतत विभो ! असों दे **हार्डिंगाच्या** शिरीं तुझा आशी ! ' ८

जात्या भीरु तथापि न लवभरही घोर संकटीं भ्याली;
ढालाचि अभेद्य पतिला प्राणव्यसनांत जी सती झाली; ९
ज्या प्रेमें स्वापत्यें त्या प्रेमें जी प्रजाजनां पाही;
जी आमुच्या सुखाची स्वसुखाहुनि अधिक काळजी वाही; १०
सौभाग्यसिंधु देवा साध्वीचा त्या अखंड वाहूं दे !
भर्त्यासह संसारीं चिरसुख भोगीत तसि राहूं दे ! ११
देवा ! पतिपत्नींचा जो घडिला त्वां अपूर्व हा जोडा,
गावा त्याचा महिमा तों तों तो गायिला गमे थोडा. १२
"आम्ही प्रजाजनांच्या देतों हातांत आमचे प्राण"—
ह्या त्यांच्या वचनांनीं द्रवले जावे न काय पाषाण ? १३
सांगा औदार्याला आहे लोकांत काय सीमा या ?
नाहीं प्रजाजनीं हा—कोण म्हणे—शुद्ध मायशी माया ? १४
" होणार तें सुखें हो, कर्तव्योन्मुख सदैव राहीन !
" वंदुनि शिरीं नृपाज्ञा त्याच्या सेवेस देह वाहीन ! " १५
" निःशंक निंदकांच्या वाग्बाणांचे प्रहार साहीन,
" जातां परंतु आत्मोन्नतिमार्गे भारतांस पाहीन ! " १६
उत्कंठा हीं ज्याची थोर अशी, ब्रीदही असें थोर,
वांचवुनी त्यास विभो ! केला त्वां दूर आमचा घोर. १७

सदया ! पुनः पुन्हा तुज यास्तव करुनी प्रणाम म्हणतों कीं,
सानंद पुत्रपौत्रांसह नांदो हा सभार्य ह्या लोकीं ! १८
अविरत ह्या उभयांवर प्रभुजी तुमचा प्रसादनद वाहो !
घोकीत नित्य ह्यांच्या विमल यशाला सरस्वती राहो ! १९
ह्यांच्या उपकारांचें आम्हांला हो कधीं न विस्मरण !
लावो सन्मार्गाला लोकां ह्यांचें विशुद्ध आचरण ! २०
देशाभिमान ह्यांचा होवो आम्हां सदा उदाहरण !
प्रिय हो स्वदेशसेवा–व्रतहि तसें तत्समान आमरण ! २१
आलें आज सुखाचें, पुढती यावीं अशींच बहु वर्षें !
चिरकाल साजरा हा जन्मदिनोत्सव असाच हो हर्षें ? २२



## मंगलाचरण.

[ महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेच्या प्रथम अंकांत प्रथमारंभीं. ]

योग्य स्थान मिळेना साहित्याची करावया चर्चा,
म्हणुनी वाग्देवीची होय न व्हावी जशी तशी आर्चा; १
आपत्ति दूर व्हाया ती हा पहिलाच रोवुनी स्तंभ,
आज **महाजन**हस्तें केला ह्या मंदिरास आरंभ. २
अल्पारंभाचा ह्या होउनि विस्तार फार वाढावें
वैभव **वाग्देवीचें**, पूर्ण मनोरथहि आपले व्हावे, ३
यास्तव सर्व **मराठी** भाषेचे भक्त हो! पुढें या! या!
ह्या मंदिरास घालूं प्रेमाचा खोल आपल्या पाया! ४
उभवूं क्रमाक्रमानें भव्य प्रासाद ह्यावरी यत्नें,
साहित्यसिंधु मंथुनि त्यांत नवीं नित्य साठवूं रत्नें! ५
भार असे हा थोडा, पुण्य परी फार वाहतां लाधे;
परमार्थची न केवळ परिणामीं स्वार्थही खरा साधे. ६
भावाचीच भुकेली आहे ही फार **शारदा** देवी,
जिकडे भाव तिथें ही नित्य वरद हस्त आपला ठेवी. ७
सर्व मिळोनि उभारुनि यास्तव हें दिव्य देवतागार
अर्चूं **सरस्वतीला** अर्पुनि साहित्यपुष्पसंभार. ८
प्रार्थुनि तिला म्हणूं कीं, "वर दे! वरदे असाच आम्हांस—
'ह्या मंदिरी निरंतर आनंदानें करीन मी वास." ९

## नवयुग.

श्वेतद्वीपामध्यें सात समुद्रांपलीकडे थेट
आहे दूर विलायत नांवाचें एक थोरलें बेट. १

गोरी दुनया सगळी; वर्ण तिथें गौर कावळ्याचाही;
शाईशिवाय दुसरा काळा तिकडे पदार्थही नाहीं. २

घर ना दार जनांचा सर्व व्यवहार सागरीं चाले;
जलचर संज्ञा यास्तव ते ह्या लोकांत पावते झाले. ३

साम्राज्य बायकोचें त्या द्वीपीं, कंपनी तिचें नांव;
मोठी चतुर शहाणी, न कळे कोणासही तिचा भाव. ४

हिमनगशिखरीं झाली करिती ती द्वापरीं तपश्चर्या,
दे सुप्रसन्न होउनि म्हणुनि तिला राज्य शंभुची भार्या. ५

सुटला कंप शरीरीं कालांचें रूप पाहुनी विकट,
लोकांत ‘ कंपनी ’ हें नांव तिचें म्हणुनि जाहलें प्रकट. ६

त्यावर सामर्थ्यानें आवरुनी पांचही महाभूतें
निर्वंध शासिते ती ह्या सकला सागरांवरा भूतें. ७

बसुनी स्वस्थानीं ती पृथ्वीचा कारभार चालविते;
तारायंत्रद्वारें सूत्रें सारीं अचूक हालविते. ८

सुत कपतान गव्हर्नर—नामक असती तिचे महाबलधी;
रिपुबलधीच न केवळ मंथिति ते सगरपुत्रसे जलधी. ९
शास्ते ते अवनीचे सरकारहि तेच आमचे असती;
अढळ जनांच्या चित्तीं हीच सदा होय भावना वसती. १०
साम्राज्य कंपनीचें आटपलें; पावली तिची जागा
आजी तुझी नरेंद्रा **देवी व्हिक्टोरिया** महाभागा ! ११
धाडी स्वपुत्र पौत्रां घ्याया तीं आमचा समाचार;
अज्ञान दूर दवडी उघडुनियां ज्ञानमंदिरद्वार. १२
होते जळचर पूर्वीं सहचरसे लागले दिसाया ते;
**हिंद-विलायत** बहिणी, हेंहि उमगलें हळू हळू नातें. १३
भ्रम निरसला, तथापि न निरसे तो दुष्ट आप-परभाव;
साम्राज्यभावनेची तेणें मध्येंच खुंटली धांव. १४
स-सचिव स-दार इकडे येउनि राया ! परंतु वात्सल्यें
उपटूनि काढिलीं त्वां लोकमनांतुनि नवीं जुनीं शल्यें. १५
**हिंद–विलायत** बहिणी प्रेमें भेटोनियां कुरुक्षेत्रीं
म्हणत्या झाल्याः "आतां जुळली हो घट्ट आमची मैत्री!" १६
"मिरवा अशाच दोघी प्रेमें हातांत हात वाळून
" लावा विरोध मत्सर राज्यांतुनि दूर ह्या पिटाळून." १७
आदेश हा तुझा त्या स्वशिरीं वंदुनि उभारुनी बाही
म्हणातिः 'तथास्तु नृपाला ! तव यश गातील हें दिशा दाही!' १८

आशीर्वाक्सुमनांचा मेघ नरेश्वरशिरीं तयीं वर्षे;
जयजयकार नृपाचा करिती आबालवृद्ध जन हर्षे. १९
संपादक स्वपत्रें करुनि सुशोभित सुवर्ण रेखांनीं
तो वर्णिती महोत्सव विस्तृत वैचित्र्यपूर्ण लेखांनीं. २०
'नवयुग आलें नवयुग!' घोष पडे हा चहूंकडे कानीं;
इंग्लंदाहि म्हणे ती—"केलें मज आज धन्य लेकांनीं." २१
वीणादंड उभारुनि नाचे वाग्देवताहि आनंदें;
गा गा म्हणे कवींना नवयुगमहिमा नव्या नव्या छंदें. २२

नवयुग, पु० १, अंक १.

## राष्ट्रगीत, १

( "देवी श्री व्हिक्टुरिया" या चालीवर. )

विश्वपते ! पूर्ण दया करुनि तीवरी
संरक्षण व्हिक्टुरिया राणिचें करीं ! ॥ धृ ० ॥
देउनियां तीस विपुल सौख्य सौख्यदा,
यशस्विनी करुनि तिला ह्या जगीं सदा,
वाढवुनी बहुत तिची कीर्तिसंपदा,
देवा' पावा' ठेवा' तास सतत' सौख्यभरित'
राज्य करित' आमुच्यावरीं ! १
धांव विभो ! शत्रु तिचे नेउनी लया,
शक्तियुक्तिहीन शीघ्र करुनियां तयां,
विध्वंसीं कपटकृती सर्व त्यांचिया,
ईशा' आशा' ऐशा' तूंच पूर्ण' करुनि तूर्ण'
नित्य अवन' आमुचें करीं ! २
पावुनियां अतुल भाग्य तव वरान्वयें,
राज्य दीर्घकाळवरी करुनियां स्वयें,
पाळुनियां संतत ह्या स्वप्रजा नयें,
आर्या' विजया' सदया' स्त्रीयाकृति' मूर्तिमती'
कीर्तिच' भासवी खरी' ! ३

## राष्ट्रगीत, २

——:-*-:——

[ महाराणी व्हिक्टोरियेच्या राज्यारोहण-ज्युबिली-महोत्सवाचे दिवशीं ( १६ फेब्रुवारी १८८७ ) मरहूम कैकशरू नौरोजी काब्राजी यांनीं " God save the Queen " या राष्ट्रगीताचीं संस्कृत, मराठी आणि गुजराथी भाषांतरें, मूळ चालीस अनुसरून, करून घेऊन मुंबईंत प्रसिद्ध ठिकाणीं गाऊन दाखविलीं. मराठी भाषांतर गंगाधर रामचंद्र मोगरे यांजकडून करून घेतलेलें, त्यांत मराठी वाचकांस काव्य न दिसलें तरी, जशाचें तसें याखालीं दिलें आहे: ]

राक्षिं ईश तूं महाराणी !
दीर्घ वांचवीं थोर राणी !
राक्षिं ईश राणी !
सौख्य कीर्ति आणि यश
देउनीयां बहुत दिवस
राज्य करित ठेविं तीस
राक्षिं ईश राणी !
हे ईश तूं धांव तूर्ण
वैरि सर्व करुनि भग्न
त्यांस ने लयास.
द्वंद्व भेद दूर जावो
ज्ञान कला वृद्धि पावो

शांति लाभ अम्हां होवो
देइं या वरास.

पूर्णलोभवृष्टि कर
देवा व्हिक्टोरीयेवर
बळ कीर्ति क्षेम.

रंक राव साभिमान
नित्य देवो तीस मान
ठेवो सर्व लोक समान
तीच्या नामीं प्रेम.

छत्र होई तूंच तीस
शक्तिमान हे जगदीश !
देव मोक्षदानी.
हो प्रार्थना ही सुफळ
पूर्व पाश्चात्य सकळ
राजभक्तगीत विमळ
राखीं ईश राणी !

## ३. राष्ट्रगीत.

( अनुष्टुप् छंद. )

रक्षीं **विभो** ! महाभागा । आमुच्या **जॉर्ज** राजया
चिरायुषी करीं **राया** । राज्य हें चालवावया ! १
संग्रामीं विजयश्री दे । संसारीं सौख्यलाभ दे
दीर्घकाल करो **राजा** । प्रजापालन हा मुदें ! २
उठा हो **प्रभुजी** ! लावा । राजशत्रु पिटाळुनी
सेना निर्दाळुनी त्यांच्या । नाश त्यांचा करा क्षणीं ! ३
व्यूह ढासळुनी त्यांचे । खालीं पाडा धडाडुनी
धूळ घाला **जगत्पाला** । तयांच्या राज्यकारणीं ! ४
आमुचा **जगदाधारा** । सर्व भार तुझ्यावरी
करीं आम्हां समस्तांच्या । **प्रभो** ! संरक्षणा करीं ! ५
हो प्रसन्न ! प्रसादांची । इष्टकामफलप्रदा
दयानिधे करीं वृष्टी । **जॉर्जराया**वरी सदा ! ६
आमचे कायदेकानू । लक्ष्यपूर्वक रक्षुनी
धर्मन्यायें सदा दक्ष । राहुनी लोकशासनीं ७
सर्वकाल सुखानंदें । आम्हां सर्वां प्रजाजनां
**जॉर्ज** भूपति हा लावो । गावया आपल्या गुणां ! ८

## ४. राष्ट्रगीत.

[नं. १ राष्ट्रगीत महाराणी व्हिक्टोरिया राजसिंहासनाधिष्ठित असतांना रचिलें. त्यांतच कांहीं फेरफार करून, पंचम जॉर्ज बादशाहा गादीवर आल्यावर, हें प्रसिद्ध केलें. ]

रक्षि विभो ! आमुचिया दयित राजया
प्रजावनार्थ दे उदंड आयु दे तया ॥ धृपद ॥
विजयश्री त्यास वरो नित्य संगरीं
नांदतसो सौख्य सदा त्याचिया घरीं
ढाळितसो विमल कीर्ति चवर त्यावरी
देवा' पावा' लावा' त्यास सतत' सौख्यभरित राज्यशकट
चालवावया ॥ रक्षि विभो ॥ १ ॥
धांव विभो धांव ! तदरिवर्ग ने लया
शक्तियुक्तिहीन शीघ्र करुनियां तयां
विध्वंसीं कपटकृती सर्व त्यांचिया
ईशा' आशा' ऐशा' तूंच पुर्ण' करुनि तूर्ण' अस्म-
दवनं करिं दयालया ॥ रक्षि विभो ॥ २ ॥
पावुनियां अतुल भाग्य तव वरान्वयें
राज्य दीर्घकाळवरी करुनियां स्वयें
पाळुनियां संतत ह्या स्वप्रजानयें
सुरसें' स्वयशें' हर्षें' स्वप्रजेस' ह्या अशेष' हा नरेश'
लावुं गावया ॥ रक्षि विभो ॥ ३ ॥

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0001816

REFBK-0001816